cmyk




दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

शिवतेज आठवावे...
शिवप्रताप आठवावा..
नित्यनेम आमचा..
नित्य हीच पूजा
शिवविचार जागवावा...
मनामनांत आपुल्या
नित्य हाच ध्यास..
नित्य हाच अभ्यास
गीत शिवरायांचे
अखंड गाऊ..
अखेरचे श्वासही
शिव चरणी वाहू...



बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२९३ गुरूवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सिब्बल यांचा एपस्टीनशी संबंधच नाही

नवी दिल्ली : काँग्रेस नेते पवन खेडा यांनी मंगळवारी माजी केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल यांचा जेफ्री एपस्टीन फाइल्सशी संबंध असल्याचा दावा फेटाळून लावला आणि म्हटले की, भाजप नेते या प्रकरणात खोटी कहाणी रचण्याचा प्रयत्न करत आहेत. खेडा यांनी वरील एका पोस्टमध्ये लिहिले ज्या कागदपत्राचा उल्लेख केला जात आहे ते ५९ पानांचे कॅलेंडर आहे. ज्यामध्ये न्यूयॉर्कमध्ये नियोजित सार्वजनिक कार्यक्रम, हे कागदपत्र मार्गॉक्स रॉजर्स यांनी १० सप्टेंबर २०१० रोजी एपस्टीनच्या वैयक्तिक सहाय्यक लेस्ली ग्रॉफ यांना पाठवल्याचा आरोप आहे.

### पाक संघावर चक्क भांडी घासण्याची वेळ

इस्लामाबाद : एकेकाळी जागतिक हॉकीवर राज्य करणा–या पाकिस्तान हॉकी संघाची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. ऑस्ट्रेलिया दौ–यावर गेलेल्या पाकिस्तान हॉकी संघाला तेथे जे हाल सहन करावे लागले, त्यावरून कर्णधार शकील अहमद बट याने पाकिस्तान हॉकी फेडरेशनवर जोरदार हल्ला चढवला आहे. आम्हाला स्वत:ची भांडी स्वत: घासावी लागली आणि १३ तास विमानतळावर ताटकळत राहावे लागले असा खळबळजनक खुलासा कर्णधाराने केला आहे. या दौ–यात खेळाडूंना अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

### एसटी बस–ऑटोच्या धडकेत ५ ठार

अमरावती : अमरावतीत भीषण अपघात झाला आहे. एसटी बस आणि ऑटोच्या धडकेत शाळकरी मुलांसह अन्य चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर इतर तीन प्रवासी गंभीर जखमी झाले जखमींना उपचारासाठी हलवले . सदर घटना सकाळच्या सुमारास जिल्ह्यातील वरुड–राजुरा बाजार रोडवर घडली आहे. या भीषण अपघातानंतर परिसरात खळबळ उडाली असून पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत. अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळेतील मुलं हे वरुडला रिक्षाने जात होते.

### चिनी रोबोटला स्वदेशी सांगणे भोवले

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत सुरू असलेल्याएआय समिटमध्ये एका रोबोटिक श्वानावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. गलगोटिया युनिव्हर्सिटीने एका चिनी कंपनीच्या रोबोटला स्वत:चा शोध म्हणून सादर केल्याचा आरोप झाल्यानंतर, सरकारने युनिव्हर्सिटीला एक्सपो एरिया रिकामी करण्याचे आदेश दिले आहे. यावरून आता देशात राजकीय आरोप–प्रत्यारोपही सुरू झाले आहेत.सोशल मीडियावर गलगोटिया युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसर नेहा सिंह यांचा एक व्हीडीओ व्हायरल झाला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१८ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२२.५० क्विंटल | २,०५१ | २,८७० | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९७.५० क्विंटल | ३४० | ४,६०० | ३,३३६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०२.०० क्विंटल | ६,४०० | ७,८८० | ७,४९३ |
| उडीद : २४.०० क्विंटल | ६,४०१ | ६,४१५ | ६,४१० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,०६० | ३,१३३ | २,७१५ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ३९.५० क्विंटल | ५,२०० | ५,३०० | ५,२५० |
| हरभरा: ३२.०० क्विंटल | ५,००० | ५,०८० | ५,०२९ |

# भारत–अमेरिका करार रद्द करा; ९ मार्चपूर्वी देशभर आंदोलनाची हाक

## शेतकरी संघटनांचा इशारा, राष्ट्रपतींनी स्वाक्षरी न करण्याचे आवाहन

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

भारत–अमेरिका व्यापार कराराविरोधात शेतकरी संघटनांचा विरोध अधिक तीव्र झाला असून हा करार तात्काळ रद्द करावा, अशी ठाम मागणी संयुक्त किसान मोर्चा (एसकेएम) ने केली आहे. हा करार 'शेतकरीविरोधी' असल्याचा आरोप करत ९ मार्चपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी देशभरात सार्वजनिक सभा आणि आंदोलनांची मालिका उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. ऑनलाइन पत्रकार परिषदेनंतर जाहीर करण्यात आलेल्या निवेदनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या करारावर स्वाक्षरी न करण्याबाबत निर्देश द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. केंद्रीय वाणिज्यमंत्री पियूष गोयल यांनी शेती



आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्र बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी खुले करून देशाच्या आत्मनिर्भरता आणि सार्वभौमत्वाशी तडजोड केल्याचा आरोप एसकेएमने केला आहे. यासाठी त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली जाणार असून राष्ट्रपतींना खुले पत्र पाठवण्याचा निर्णयही संघटनेने घेतला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थ मंत्रालयाकडून केरळ सरकारला पाठवलेले 'डीओ पत्र' तात्काळ मागे घ्यावे, अशी मागणीही एसकेएमने केली आहे. या पत्रात गहू आणि भातावरील बोनस योजना पुनर्विचारात घेण्यास सुचवण्यात आले होते. हे राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेवर आघात करणारे असून शेतकऱ्यांच्या न्याय्य मोबदल्याच्या हक्काला बाधा आणणारे ▶▶ पान २ वर

### मुख्यमंत्र्यांच्या भेटी, संघराज्यीय हक्कांचा मुद्दा

एसकेएमच्या राज्य समन्वय समित्यांचे शिष्टमंडळ २७ फेब्रुवारीपासून विविध राज्यांतील मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेत्यांच्या भेटी घेणार आहे. राज्यांच्या संघराज्यीय हक्कांचे संरक्षण करावे आणि भारत–अमेरिका करार रद्द करण्यासाठी केंद्रावर दबाव आणावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. भारत–अमेरिका कराराच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा शेतकरी संघटना आक्रमक झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, विरोधक हा मुद्दा आता देशभरात उचलण्याची शक्यता आहे.

# राज्यातील मुस्लिमाना दिलेले ५ टक्के आरक्षण रद्द





**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यामध्ये पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्यावरून राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारकडून मुस्लिम समाजाला देण्यात आलेले ५ टक्के आरक्षण हे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आरक्षण रद्द झाल्यामुळे आणि जात प्रमाणपत्रांची प्रक्रिया थांबवल्यामुळे मुस्लिम समाजात मोठे अस्वस्थतेचे वातावरण आहे. विशेषत: शैक्षणिक प्रवेश आणि नोक–यांमध्ये या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा–या तरुणांसमोर आता मोठे संकट उभे राहिले आहे. या निर्णयावरून ▶▶ पान २ वर

### जलील यांचा मौलानांना तिखट सवाल

माजी खासदार इम्तियाज जलील यांनी या प्रकरणात एक वेगळी बाजू मांडली आहे. त्यांनी मुस्लिम समाजातील धार्मिक नेतृत्वावर (मौलानांवर) निशाणा साधला. निवडणुकीच्या दोन–तीन महिने आधी सक्रिय होणारे मौलाना आता गप्प का? ज्या मौलानांनी अजित पवारांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले होते, त्यांनीच आता या आरक्षणाच्या लढाईचे नेतृत्व करावे. तसेच, केवळ मुस्लिमच नाही, तर मराठा आणि ब्राह्मण समाजातील गरीब विद्यार्थ्यांनाही आरक्षणाची गरज असल्याचे मत जलील यांनी व्यक्त केले.




बीडः आज शिवजयंती निमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे सुशोभीकरण करून विद्युत रोषणाई करण्यात आल्यानंतर मनमोहक दिसणारे छायाचित्र.

# घटस्फोट प्रकरणी व्हॉटस्ॲप चॅट्स, कॉल रेकॉर्डिंग वापरास परवानगी

**रायपूर । प्रतिनिधी**

पत्नीला स्वत:ची माहिती गुप्त ठेवण्याचा अधिकार नक्कीच आहे; पण हा अधिकार इतका मोठा नसावा की, दुस–या पक्षाला (उदा. पती किंवा पत्नीलाा) आपला खटला सिद्ध करण्यासाठी पुरावे सादर करता येणार नाहीत. योग्य न्याय तेव्हाच होतो जेव्हा दोन्ही बाजूंना आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे मांडण्याची पूर्ण संधी मिळते, असे स्पष्ट करत छत्तीसगड उच्च न्यायालयाने नुकताच घटस्फोटाच्या प्रकरणात पतीने



सादर केलेल्या कॉल रेकॉर्डिंग आणि व्हॉट्सॲप चॅट्सना पुरावा म्हणून परवानगी देण्याचा कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे. ▶▶ पान २ वर

# राज्यसभेच्या राज्यातील ७ जागांसाठी १६ मार्चला निवडणूक

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

राज्यसभेच्या एप्रिल २०२६ मध्ये रिक्त होणा–या जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील विविध राज्यांमधील रिक्त जागांसाठी ही निवडणूक होणार असून त्यामध्ये सर्वाधिक ७ जागा महाराष्ट्रातून रिक्त होत आहेत. निवडणूक आयोगाने राज्यसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. १६ मार्च रोजी यासाठी निवडणूक होणार आणि त्याच दिवशी ▶▶ पान २ वर

### या खासदारांचा कार्यकाळ संपणार

महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, काँग्रेसच्या रजनी पाटील, राष्ट्रवादीच्या (शप) फौजिया खान, शिवसेनेच्या (ठाकरे) प्रियंका चतुर्वेदी, भाजपचे धैर्यशील पाटील आणि भागवत कराड या सात सदस्यांचा राज्यसभा कार्यकाळ एप्रिल २०२६ मध्ये संपत आहे. संख्याबळानुसार भाजपला चार , अजित पवार यांच्या राष्ट्रवादी ला एक आणि शिंदेंच्या शिवसेनेला एक जागा मिळण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीला केवळ एका मिळू शकते .

### कसं आहे बलाबल?

विधानसभेत भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांकडे १३७ आमदार असून शिंदेंच्या शिवसेनेचे ६० आमदार आहेत, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे ४१ आमदार आहेत. महाविकास आघाडीमधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे २०, काँग्रेसचे १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे केवळ १० आमदार आहेत.राज्यसभेच्या एका जागेसाठी ३७.५ आमदारांच्या मतांची आवश्यकता आहे. विधानसभेत संख्याबळ जास्त असल्याने या निवडणुकीत सध्याच्या आकडेवारीनुसार भाजपचं पारडं जड मानलं जात आहे.

# शिवमचे 13 षटकार, 11 चौकार

**अहमदाबाद । वृतसंस्था**

नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात अभिषेक शर्मा शून्य धावांवर बाद झाला. या खेळाडूने सलग तीन सामन्यांमध्ये आपले खाते उघडलेले नाही. जगातील नंबर १ फलंदाजाला टी विश्वचषकात अद्याप एकही धाव करता आलेली नाही. नेदरलँड्सविरुद्ध, विशेषतः खराब शॉट खेळला. त्याने आर्यन दत्तच्या चेंडूवर पुल शॉट मारण्याचा प्रयत्न केला, परंतु तो चुकला, ज्यामुळे त्याचे स्टंप उडून गेले. अभिषेकच्या तीन चेंडूंच्या खेळीबद्दल सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे तो स्वत:ची जर्सी ▶▶ पान २ वर

# २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी विमान पाडले?–रोहित पवार

**बारामती । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर शंका उपस्थित करत हा अपघात नसून घातपात असू शकतो, असा दावा केला आहे. नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी काही नवीन आणि गंभीर माहितीच्या आधारे तांत्रिक मुद्यांचा उल्लेख करत




घातपाताचा संशय दृढ झाल्याचे सांगितले आहे. रोहित पवार म्हणाले की, २७ तारखेला घडलेल्या काही घटनांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या दिवशी काही व्यक्तींची भेट, आलेले फोन कॉल्स आणि त्यानंतर घडलेली घटना यामध्ये संबंध असू शकतो का?, याचा तपास होणे गरजेचे आहे. रोहित पवारांच्या मते समोर येत असलेली माहिती पाहता हा केवळ अपघात नसून नियोजनबद्ध कारवाई असण्याची शक्यता नाकारता येत नाही.विमानाच्या खरेदीविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, हे विमान मूळ ३५ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले होते. मात्र त्याची सध्याची स्थिती आणि इंजिनची गुणवत्ता पाहता आज त्याची बाजारातील किंमत जास्तीत जास्त १० ते १५ कोटी रुपये असू शकते. काही तज्ज्ञांच्या मते आणि ज्यांनी हे विमान पूर्वी चालवले, त्यांच्या मते तर १० कोटींनाही ▶▶ पान २ वर

# पुण्यात प्रशासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे महानगरपालिका, यशदा आणि संवाद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे प्रशासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन शनिवार, दि. २१ व रविवार दि. २२ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. संमेलन बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आले असून संमेलनाचे यंदाचे दुसरे वर्ष आहे, अशी माहिती यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, यशदाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर, संवाद, पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.**

संमेलनाचे उद्घाटन शनिवार, दि. २१ रोजी



सकाळी १०:३० वाजता महापौर मंजुषा नागपुरे आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. संमेलनात शासकीय अधिका–यांच्या उत्कृष्ट साहित्यकृतीला वाङ्मय पुरस्कार देऊन गौरविले जाणार आहे. दुपारी 'शासकीय अधिका–यांच्या साहित्य लेखनातील आव्हाने' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, केंद्रीय उच्च शिक्षा मंत्रालयातील अतिरिक्त सचिव आनंद पाटील, नवी दिल्लीच्या महाराष्ट्र सदनातील निवासी आयुक्त सुशील गायकवाड यांचा सहभाग असणार आहे. 'शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनाची भूमिका व आव्हाने' या विषयावर पहिले संमेलनाध्यक्ष, यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात ▶▶ पान २ वर

# मद्यपी विमान कर्मचाऱ्यांना आता निलंबनाऐवजी समुपदेशन

**मुंबई । प्रतिनिधी**

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) विमान कर्मचा–यांसाठी श्वास विश्लेषक तपासणीबाबत नागरी विमान वाहतूक नियम शिथिल केले आहेत. पहिल्या प्रकरणात रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ०.००९% पर्यंत असलेल्या आढळल्यास संबंधित कर्मचा–याचे समुपदेशन करण्यात येणार आहे. पूर्वी अशा कर्मचा–याला तीन महिने निलंबनाची तरतूद नियमात होती. मात्र वारंवार अल्कोहोलचे सेवन करणा–या कर्मचा–यांवर निलंबनाची कडक कारवाई करण्यात येणार आहे.

डीजीसीएने फ्लाइट क्रूसाठी सुधारित ब्रेथ ॲनालायझर नियमावली लागू केली आहे. ज्यामध्ये रक्तातील अल्कोहोल पातळीपर्यंत (०.००९ ग्रम/१०० मिली) आढळल्यास, पहिल्यांदा निलंबनाऐवजी समुपदेशन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या नवीन नियमांतर्गत व्हिडिओ रेकॉर्डिंग अनिवार्य आहे. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मंत्री झिरवाळ आणि अध्यक्ष नार्वेकर

भाजपकडे अर्थात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे गृह खाते असताना एखाद्या मंत्र्याच्या कार्यालयात एसीबीची धाड पडण्याची ही पहिली वेळ नव्हे. मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितलेले एखादे काम पेंडिंग ठेवल्यामुळे आदिवासी समाजातून आलेल्या नरहरी झिरवाळ या या कॅबिनेट मंत्र्यांच्या कार्यालयात एसीबीची धाड पडली असावी अशी शंका मंत्रालयातीलच अधिकारी व्यक्त करत आहेत. यापूर्वी पहिल्यांदाच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर भर कॅबिनेट बैठकीतच तत्कालीन मंत्री एकनाथ खडसे आणि त्यांचे खटके उडत असत. त्यावेळी पहिला उपाय म्हणून खडसे यांच्या विरोधात मुंबईतील प्रमुख वृत्तपत्रात बातम्या पेरण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर थेट त्यांच्या कार्यालयात एसीबीची धाड टाकून खडसे यांच्या एका खाजगी निकटवर्तीयाला अटक करण्यात आली. त्यावेळी सुद्धा गृह खात्याचा कार्यभार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच होता.आमचे मित्र मुंबईचे जेष्ठ पत्रकार नितीन सावंत पुढे लिहतात की खरे म्हणजे त्यावेळी मुख्यमंत्र्यांचे टार्गेट हे खडसे यांची पालखी वाहणारे आणि दुसरे उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी असलेले असे त्यांचे दोन निकटवर्तीय होते. परंतु ते कार्यालयात उपस्थित नसल्याने दुसरे खाजगी गृहस्थ एसीबीच्या जाळ्यात सापडले. यावरून एकनाथ खडसे यांची खूपच बदनामी झाली. महसूल, कृषी, एक्साइज, अल्पसंख्यांक आदि खूप खात्यांचा कार्यभार त्यावेळी खडसे यांच्याकडे होता. त्यांना मुख्यमंत्रीपद न दिल्याने पक्षाने त्यांना एवढी महत्त्वाची खाती देऊन त्यांचा सन्मान केला होता. परंतु आपल्याला ज्युनियर असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री पद गेल्याने त्यांची अवस्था ' सहन होत नाही सांगता येत नाही 'अशी होती. अखेर ते मुख्यमंत्र्यांच्या ट्रॅप मध्ये सापडले. शेवटी त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा घेऊन खडसे यांना घरी बसवण्यात आले.

खडसे प्रकरणाचा धडा घेऊन पक्षात आणि विधिमंडळात सीनियर असलेल्या विनोद तावडे, सुधीर मुनगुंटीवार आदी मंत्र्यांनी शस्त्रे टाकली. पुढे त्यांचाही बंदोबस्त देवेंद्र फडणवीस यांनी व्यवस्थित केला. फक्त पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री पदाची अपेक्षा व्यक्त करणाऱ्या पंकजा मुंडे यांचा चिक्की घोटाळा लगेचच बाहेर आला. त्यामुळे सध्याच्या मंत्रिमंडळात भाजपचे सर्व मंत्री आणि काही आमदार मुख्यमंत्र्यांच्या आगे मागे फिरण्याची एकही संधी सोडत नाहीत. मात्र अजून एक मुंबईतील मंत्री हे मुख्यमंत्र्यांच्या टारगेटवर आहेत. त्यामुळे हे मंत्री महोदय सर्व पावले सावध टाकत असतात. ते राजकीय दृष्ट्या परिपक्व असल्यामुळे अजून पर्यंत तरी मुख्यमंत्र्यांना ते कुठे सापडत नाहीत. मात्र ते मुख्यमंत्र्यांच्या आगे मागेही फिरत नाहीत.

मंत्रालयात मंत्री कार्यालयात कारभार कसा चालतो हे नेहमी मंत्रालयात फिरणाऱ्या सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांना माहित आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागातून आणि आदिवासी समाजातून आलेल्या नरहरी झिरवळ या मंत्री महोदयांच्या कार्यालयात घडलेल्या गोष्टींचे कोणालाही आश्चर्य वाटले नाही. भाजपच्या मंत्र्यांच्या कार्यालयात सर्वकाही आल बेल असते असे नाही. बहुतेक मंत्र्यांचे आर्थिक व्यवहार हे फक्त बंगल्यावर चालतात. त्यामुळे एखादा घाईत असणारा लिपिक सापडतो. झिरवळ त्यांच्या कार्यालयात पडलेली धाड ही मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरूनच पडली असावी अन्यथा एखाद्या मंत्र्याच्या कार्यालयात येण्याची हिंमत एसीबी चे अधिकारी करणार नाहीत.

एका बाजूला आदिवासी समाजातील महिलेला आम्ही राष्ट्रपती केले अशी शेखी फिरवायची आणि दुसऱ्या बाजूला आदिवासी समाजातील एखाद्या गरीब आदिवासी मंत्र्याला टार्गेट करायचे अशी भाजपची दुहेरी नीती ही लपून राहिलेली नाही.

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे जमीन मोजणी प्रकरण दोन दिवसातच थंड झाले. अलिबाग तालुक्यातील काही गावांमध्ये राहुल नार्वेकर आणि त्यांचे भाऊ मकरंद नार्वेकर यांनी शेकडो एकर जमीन विकत घेतली असा विरोधकांचा आरोप आहे. अशाच एका जमिनीची मोजणी करताना शेजारच्या शेतकरी असलेल्या जमीन मालकांनी आक्षेप घेतल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तेथून पळ काढला असा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अध्यक्ष नार्वेकर हे अस्वस्थ होते. परंतु दुसऱ्या दिवशी हे प्रकरण थंड करण्यात ते यशस्वी झाले. ज्या शेतकऱ्यांनी आणि जमीन मालकांनी आक्षेप घेतला होता त्यांनी याबाबत खुलासा करताना गैरसमजातून आमच्याकडून तो प्रकार घडला असे सांगितले. त्यामुळे चाणाक्ष नार्वेकर यांनी हे प्रकरण मिटवण्यात दोनच दिवसात यश मिळवले.

# शिवजन्म : स्वराज्याच्या सूर्याचा उदय

**महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव म्हणजे पराक्रम , दूरदृष्टी , न्यायप्रियता आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे तेजस्वी प्रतीक होय . फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ , म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी या दुर्गम पण सुरक्षित किल्ल्यावर या तेजस्वी सूर्याचा जन्म झाला . आई जिजाऊंच्या संस्कारातून आणि शाहाजी राजांच्या पराक्रमातून घडलेले हे व्यक्तिमत्त्व पुढे संपूर्ण भारताच्या इतिहासात अजरामर झाले.**



जिजाऊंनी बालशिवबाला रामायण , महाभारत आणि पुराणातील पराक्रमी वीरांच्या कथा सांगून त्याच्या मनात स्वराज्याची बीजे रोवली . अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा , धर्मनिरपेक्ष विचारसरणी आणि प्रजेवर प्रेम करण्याची वृत्ती याच संस्कारातून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात दृढ झाली. बालपण आणि स्वराज्याचे स्वप्न : - शिवाजी महाराजांचे बालपण मावळातील कठीण पण प्रेरणादायी वातावरणात गेले . दादोजी कोंडदेव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी युद्धकौशल्य , शस्त्रविद्या आणि राज्यकारभाराची प्राथमिक तत्त्वे आत्मसात केली . सह्याद्रीच्या कुशीत वाढलेल्या या बालराजाच्या मनात स्वराज्याचे स्वप्न आकार घेत होते . ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' या विचाराने त्यांनी पुढील आयुष्याचा मार्ग निश्चित केला. स्वराज्याची पायाभरणी : - १६४५ साली रायरेश्वराच्या मंदिरात शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांसमोर स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली . हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो . त्यानंतर त्यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याच्या पहिल्या विजयाची नोंद केली . पुढे राजगड , पुरंदर , कोंढाणा , जावळी अशा किल्ल्यांवर विजय मिळवत त्यांनी स्वराज्याचा विस्तार सुरू ठेवला. अफजलखान वध : धैर्य आणि बुद्धिमत्तेची पराकाष्ठा - १६५९ मध्ये बीजापूरचा सरदार अफजलखान स्वराज्याचा नायनाट करण्यासाठी आला . प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेल्या भेटीत शिवाजी महाराजांनी अद्वितीय धैर्य आणि चातुर्य दाखवत अफजलखानाचा वध केला . या घटनेने स्वराज्याच्या अस्तित्वाची दखल संपूर्ण दख्खनभर घेतली गेली . ही घटना केवळ युद्धातील विजय नव्हती , तर आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची घोषणा होती. पन्हाळगड ते विशाळगड : बाजीप्रभूंचा पराक्रम - १६६० मध्ये सिद्दी जौहरच्या वेढ्यातून पन्हाळगडातून सुटताना महाराजांना विशाळगड गाठायचा होता . पावनखिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांनी प्राणाची आहुती देत शत्रूला अडवले आणि महाराजांना सुरक्षित विशाळगड गाठता आले . ''जोपर्यंत विशाळगडावर तोफांचे तीन आवाज येत नाहीत , तोपर्यंत ही खिंड सोडायची नाही'' हा बाजीप्रभूंचा निर्धार स्वराज्यनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण ठरला .

**आग्रा सुटका : धाडस आणि बुद्धीचे अद्वितीय मिश्रण –**

१६६६ मध्ये औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आग्रा येथे नजरकैदेत ठेवले . परंतु महाराजांनी आपल्या चातुर्याने आणि धाडसाने कैदेतून सुटका करून घेतली . मिठाईच्या टोपल्यांतून बाहेर पडत त्यांनी दिल्लीच्या सामर्थ्याला चकवा दिला . ही घटना इतिहासातील सर्वात धाडसी सुटका मानली जाते .

राज्याभिषेक : स्वराज्याचा सुवर्णक्षण – ६ जून १६७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला . हा केवळ एका राजाचा राज्यारोहण नव्हता , तर स्वराज्याच्या स्वप्नाची प्रत्यक्ष पूर्तता होती . हिंदवी स्वराज्याची स्थापना अधिकृतपणे घोषित झाली . राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक संघटित केले . अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून त्यांनी सुबक आणि जबाबदार राज्यकारभाराची पायाभरणी केली . प्रशासन आणि न्यायव्यवस्था : - शिवाजी महाराजांचे राज्यकारभार अत्यंत लोकाभिमुख आणि न्यायप्रिय होता . त्यांनी करप्रणाली सुलभ केली , शेतकऱ्यांचे संरक्षण केले आणि लुटालूट थांबवली . ''प्रजा हीच परमेश्वर'' या तत्त्वावर त्यांनी राज्य चालवले . अष्टप्रधान मंडळात पंतप्रधान , अमात्य , सुमंत , सेनापती , सचिव , न्यायाधीश , पंडितराव आणि मंत्री अशा आठ पदांचा समावेश होता . यामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम आणि जबाबदार झाले . किल्ले आणि आरमार : सामरिक दूरदृष्टी – शिवाजी महाराजांनी सह्याद्रीतील किल्ल्यांना स्वराज्याचे बळ बनवले . सुमारे ३०० हून अधिक किल्ल्यांवर त्यांनी आपला ताबा मिळवला . रायगड , प्रतापगड , सिंहगड , राजगड , तोरणा , जंजिरा , सिंधुदुर्ग यांसारखे किल्ले स्वराज्याच्या सामर्थ्याचे प्रतीक ठरले . समुद्रावरही स्वराज्याचे वर्चस्व असावे , या विचाराने त्यांनी आरमार उभारले . सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग यांसारखे सागरी किल्ले बांधून त्यांनी परकीय आक्रमणांना आळा घातला . धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक समता – शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष राज्यकारभार केला . मंदिरांसोबत मशिदींचेही संरक्षण केले . स्त्रियांचा सन्मान राखला . शत्रूच्या स्त्रियाही सुरक्षितपणे परत पाठवल्या . त्यांच्या राज्यात जाती–पातीचा भेदभाव नव्हता . प्रत्येकाला कर्तृत्वानुसार संधी दिली जात होती . अखेरचा काळ आणि अमर वारसा : – ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांनी अखेरचा श्वास घेतला . पण त्यांचे स्वराज्याचे स्वप्न आणि आदर्श आजही जिवंत आहेत . त्यांच्या कार्यामुळे पुढे मराठा साम्राज्याची भव्य उभारणी झाली.

**शिवजयंतीचे महत्त्व : –** छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती म्हणजे स्वराज्य , स्वाभिमान आणि न्यायाचे स्मरण करणारा दिवस होय . महाराष्ट्रात आणि देशभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो . शाळा , महाविद्यालये , सामाजिक संस्था , शासकीय कार्यालये आणि गावपातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात . शिवचरित्र वाचन , पोवाडे , मिरवणुका , व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे महाराजांच्या कार्याची आठवण करून दिली जाते .

**विविधतेतून एकतेचा संदेश : –** शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही . त्यांनी संपूर्ण भारतात स्वराज्य आणि स्वाभिमानाची प्रेरणा दिली . त्यांच्या विचारांमधून ''धर्मासाठी नव्हे , तर धर्मरक्षणासाठी राज्य'' ही संकल्पना दिसून येते.

**आजच्या काळातील प्रेरणा : –** आजच्या युगातही शिवाजी महाराजांचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत . सुशासन , पारदर्शकता , शिस्त , पर्यावरण संवर्धन , स्त्रीसन्मान आणि लोकाभिमुख प्रशासन यांचे आदर्श त्यांच्या कार्यातून दिसतात . ''जिजाऊंच्या संस्कारातून घडलेला हा सिंह , सह्याद्रीच्या कुशीत वाढला आणि स्वराज्याचा सूर्य बनला'' असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही . छत्रपती शिवाजी महाराज जयंती हा केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि आत्मपरीक्षणाचा दिवस आहे . त्यांच्या आदर्शांचा वारसा जपून समाजकारण , राष्ट्रकारण आणि मानवतेच्या सेवेसाठी काम करणे हीच खरी शिवजयंती ठरेल . ''जगदंब जगदंब म्हणत उभा ठाकला सिंह , स्वराज्याचा ध्वज फडकविला सह्याद्रीच्या शिखरांवरी'' छत्रपती शिवाजी महाराजांचे तेजस्वी जीवन आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवत राहते .

**जय भवानी , जय शिवाजी !**

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# घरकुल योजनेची जिल्हा प्रशासनाकडून क्रूर थट्टा!

## ग्रामस्थांना घरकुलासाठी २ लाखांचा निधी; डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च; जिल्हाधिकारी व सीईओंकडे तक्रार –डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत बेघरांना साधारण दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते; मात्र बीड जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या डेमो घरकुलासाठी तब्बल दहा लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.**



घरकुल योजनेत केंद्र शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, राज्य शासनाकडून अतिरिक्त ५० हजार रुपये, मनरेगा अंतर्गत २६ ते २८ हजार रुपये आणि स्वच्छतागृहासाठी १२ हजार रुपये असे मिळून एकूण सुमारे दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र जिल्हा परिषद आवारातील डेमो हाऊससाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी ४ लाख ९९ हजार २७८ रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी आणखी ४ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकाच कामासाठी दोन टप्प्यांत सुमारे १० लाखांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे. उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये एक लहान हॉल व दोन छोट्या खोल्या असून दोन लोखंडी दरवाजे, दोन मोठ्या खिडक्या व एक छोटी खिडकी बसविण्यात आली आहे. घर पत्र्याचे असून सुमारे २१७ चौरस फुट बांधकामासाठी सहा कॉलम उभारण्यात आले आहेत. पत्र्याच्या घरासाठी स्लॅबसाठी लागणारे कॉलम उभारण्याची गरज काय, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे. 'घरकुल मंजुरीपासून हप्ते खात्यावर पडण्यापर्यंत चिरीमिरी द्यावी लागते. शासनाकडून मंजूर ५ ब्रास वाळू प्रत्यक्षात मिळत नाही. हातात सव्वा लाख रुपये उरतात, त्यातून घर कसे बांधायचे?' असा सवाल ग्रामस्थ करत असताना डेमो हाऊससाठी १० लाखांचा खर्च म्हणजे घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# आसाराम चित्राल यांचे निधन



**अंबड । प्रतिनिधी**

कै. आसाराम माधवराव चित्राल वय ७९ रा. अंबड यांचे मंगळवारी दि. १७/०२/२०२६ रोजी सकाळी निधन झाले. लक्ष्मीनारायण पुरा मधील निधी निवास येथून मूथा बिल्डिंग बस स्टँड रोड परिसरातील अमरधाम जालना येथील स्मशानभूमी मध्ये रात्री १०:०० वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले पाच मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# पान १ वरून...

## भारत–अमेरिका करार

असल्याचा आरोप करण्यात आला आहे. खर्च सचिव व्ही. व्हुअलनम (आयएएस) यांनाही पदावरून हटवण्याची मागणी कॅबिनेट सचिवांना पत्राद्वारे केली जाणार असल्याचे एसकेएमने स्पष्ट केले.

---

## राज्यातील मुस्लिमाना

आगामी काळात राज्यभरात राजकीय संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. यापूर्वी राज्यामध्ये मराठा आरक्षणावरून मोठा वाद पेटला. ओबीसीमधून मराठा आरक्षण देण्याच्या जरांगे पाटील यांच्या मागणीमुळे ओबीसी समाज आक्रमक झाला होता. यानंतर आता मुस्लिम समाजाचे ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. हा निर्णय जाहीर होताच, विरोधी पक्षांनी, विशेषत: काँग्रेसने सरकारवर हल्लाबोल करण्यास सुरुवात केली. मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी हा निर्णय अत्यंत दुर्दैवी आणि मुस्लिम समुदायाच्या हक्कांवर हल्ला असल्याचे म्हटले. सरकारच्या 'सबका साथ, सबका विकास' या घोषणेवर टीका करताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, एकीकडे सरकार या घोषणेला प्रोत्साहन देते आणि दुसरीकडे मागासवर्गीयांच्या प्रगतीचा मार्ग रोखते, अशी टीका वर्षा गायकवाड यांनी केली आहे.यापूर्वी मुस्लिम समाजासाठी शिक्षणात ५ टक्के आरक्षण मंजूर केले होते. तरीही, ते लागू करण्याऐवजी, सरकारने जुने अध्यादेश कालबा होऊ दिले आणि आता संपूर्ण प्रक्रिया रद्द केली आहे. काँग्रेसचा आरोप आहे की, मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्याऐवजी सरकार त्यांना पुन्हा अस्पष्टतेत ढकलत आहे २०१४ मध्ये तत्कालीन सरकारने मराठा समाजासाठी १६ टक्के आणि मुस्लिम समाजासाठी ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. तथापि, कायदेशीर अडथळे आणि अध्यादेशाची मुदत संपल्याचा हवाला देत, सध्याच्या सरकारने या जुन्या प्रक्रिया रद्द करण्याचा पर्याय निवडला आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम स्थगिती आणि अध्यादेशाची मुदत संपल्यामुळे हे पाऊल उचलणे आवश्यक होते असा प्रशासनाचा युक्तिवाद आहे.

---

## राज्यसभेच्या राज्यातील ७ जगासाठी

मतमोजणी होऊन निकाल जाहीर केले जाणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख ५ मार्च आहे. ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल, ९ तारखेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असणार आहे. त्यानंतर १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ पर्यंत मतदान होईल आणि त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार असून त्यानंतर निकाल जाहीर केले जातील. राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. येथील सदस्यांचा कार्यकाळ हा ६ वर्षांचा असतो. राज्यांच्या विधानसभेतील संख्याबळानुसार कोणत्या पक्षाचे किती सदस्य राज्यसभेवर निवडून जाऊ शकतात याचे समीकरण ठरत असते. येत्या एप्रिल २०२६ मध्ये महाराष्ट्रातील ७ खासदारांचा कार्यकाळ संपत आहे. त्यामुळे महाराष्ट्रासाठी ही निवडणूक महत्त्वाची मानली जात आहे. राज्यसभेवर वर्णी लागावी यासाठी अनेकांनी लॉबिंग करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रासह तेलंगणा, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये राज्यसभेची निवडणूक होणार आहे. राज्यामध्ये सध्या महायुतीची सत्ता आहे. विधानसभेत सर्वाधिक आमदार महायुतीचे आहेत, त्यामुळे सर्वाधिक सदस्य हे महायुतीमधून विजयी होण्याची शक्यता आहे. महायुतीच्या विधानसभेती संख्याबळानुसार त्यांचे ६ उमेदवार विजयी होऊ शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार) पार्थ अजित पवार यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. महायुतीच्या सहा जागा जिंकून येण्याची शक्यता आहे, त्यामध्ये सर्वाधिक आमदार हे भाजपचे असल्यामुळे भाजप चार जागा लढवण्याची शक्यता आहे तर शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादीला (अजित पवार) प्रत्येकी एक जागा दिली जाणार असल्याची चर्चा आहे.

---

## घटस्फोट प्रकरणी व्हॉटस्अॅप चॅट्स,

बार अँड बेंचच्या रिपोर्टनुसार, पतीने सादर केलेल्या कॉल रेकॉर्डिंग आणि व्हॉट्सअॅप चॅट्सना पुरावा म्हणून परवानगी देण्याचा निर्णय कौटुंबिक न्यायालयाने घेतला होता. मात्र या निर्णयाला पत्नीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आव्हान दिले होते. तिने आपल्या याचिकेत म्हटले होते की, पतीने आपला मोबाईल फोन हॅक करून त्यातील माहिती (पुरावे) गोळा केली आहे. पतीने असे करणे हे तिच्या खासगीपणाच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचा दावाही पत्नीने केला होता. या याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायमूर्ती सचिन सिंह राजपूत यांनी स्पष्ट केले की कौटुंबिक न्यायालयात पुराव्यांचे नियम थोडे वेगळे असतात. कौटुंबिक न्यायालय कायद्याच्या कलम १४ नुसार, वादाचा निकाल लावण्यासाठी आवश्यक वाटल्यास न्यायालय कोणत्याही पुराव्याचा विचार करू शकते, मग तो पुरावा सामान्य कायद्यात बसत असला किंवा नसला तरीही. त्यामुळेच जर एखाद्याने माझ्या खासगी गोष्टी उघड होत आहेत असा आक्षेप घेतला आणि त्या कारणावरून न्यायालयाने पुरावे नाकारले, तर या कलमाचा काहीच उपयोग राहणार नाही. गोपनीयता हा शेवटचा शब्द नाही: जरी खासगीपणाचा अधिकार हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असला, तरी तो अमर्याद नाही. मर्यादा आणि अटी: परिस्थितीनुसार या अधिकारावर काही निर्बंध किंवा मर्यादा येऊ शकतात. काही विशिष्ट परिस्थितीत (जसे की सत्य शोधण्यासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी) या अधिकारात हस्तक्षेप केला जाऊ शकतो, असेही न्यायमूर्ती सचिन सिंह राजपूत यांनी नमूद केले. तसेच कौटुंबिक प्रकरणांमध्ये पती–पत्नीच्या खासगी आयुष्यातील गोष्टीच पुराव्याच्या स्वरूपात समोर येतात. जर गोपनीयतेच्या कारणास्तव हे पुरावे नाकारले, तर कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा मूळ उद्देशच संपून जाईल असे नमूद करत पत्नीने दाखल केलेली याचिका फेटाळली.

---

## २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी

ते घेणे योग्य ठरले नसते, असे त्यांनी नमूद केले. रोहित पवारांनी इन्शुरन्स संदर्भात मोठा मुद्दा उपस्थित केला आहे. विमानाची इन्शुरन्स व्हॅल्यू सुमारे ५५ कोटी रुपये होती. मात्र 'लायबिलिटी इन्शुरन्स' तब्बल २१० कोटी रुपये असल्याचे त्यांनी सांगितले.या रकमेचा समावेश विमानात बसलेले लोक, विमान एखाद्या घरावर किंवा प्राण्यांवर पडले तर होणारे नुकसान, या सर्वांचा समावेश होतो. याशिवाय २१० कोटी रुपयांच्या एकूण विमा रकमेपैकी मुख्य पायलटला किती रक्कम मिळाली असती, ही माहिती त्यांना होती का, आणि प्रत्यक्षात ही रक्कम मिळणार होती का, २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी अजित दादांचे विमान पाडले का? याबाबत स्पष्टता आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. केंद्रीय मंत्री राममोहन नायडू यांनी ९० कोटी रुपये खर्चून आधुनिक तपास प्रयोगशाळा सुरू केल्याचे सांगितले जाते. मग या प्रकरणाचा तपास देशाबाहेर का पाठवला जात आहे? भारतात उपलब्ध तांत्रिक साधनांचा वापर का केला जात नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विमानातील इंधन टाकीबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला. अतिरिक्त इंधन टँक ठेवण्यात आले होते का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

---

## शिवमचे १३ षटकार,

घालून मैदानात उतरला नाही. अभिषेक शर्मा मोहम्मद सिराजची जर्सी घालून क्रीजवर उतरला. सलग दोनदा शून्यावर बाद झाल्यानंतर, घालून मैदानात उतरला. परंतु अभिषेक पुन्हा शून्य धावांवर बाद झाला. या टी विश्वचषकात अभिषेक शर्मा क्रीजवर येतो आणि लगेचच निघून जातो. अभिषेकने या स्पर्धेत आतापर्यंत फक्त ८ चेंडू खेळले आहेत. तो अमेरिकेविरुद्ध पहिल्याच चेंडूवर बाद झाला. पाकिस्तानविरुद्ध अभिषेकने ४ चेंडूत त्याची विकेट गमावली आणि नेदरलँड्सविरुद्ध त्याने ३ चेंडूत त्याची विकेट फेकली. अभिषेक शर्मा त्याच्या गेल्या ७ टी डावात पाच वेळा शून्यावर बाद झाला आहे. हा सातत्यपूर्ण बाद होणे त्याच्यासाठी चिंतेचा विषय बनला आहे. टी विश्वचषकात सलग तीन वेळा शून्यावर बाद होणारा अभिषेक शर्मा हा पहिला खेळाडू आहे. हा अवांछित विक्रम करणारा तो पहिला भारतीय सलामीवीर आहे. अभिषेकपूर्वी वॉशिंग्टन सुंदरलाही सलग तीन वेळा शून्यावर बाद करण्यात आले आहे, परंतु सलामीवीर म्हणून अशी कामगिरी लज्जास्पद आहे. ईशान किशनला १८ धावा करता आल्या. तिलक वर्माने ३१ धावा केल्या आणि कर्णधार सूर्यकुमार यादवने ३४ धावा केल्या. शिवम दुबेने या नंतर भारताची बाजू सांभाळली. त्याने ६६ धावांची स्फोटक खेळी खेळली आणि चेंडूत धावा केल्या. हार्दिक पंड्यानेही ३० धावा केल्या. रिंकू सिंगने नाबाद ३० धावा केल्या. आज भारतीय संघात दोन मोठे बदल पाहायला मिळायले. अक्षर पटेलच्या जागी वॉशिंग्टन सुंदरला स्थान मिळाले आणि कुलदीप यादवच्या जागी अर्शदीप सिंगला संघात स्थान देण्यात आले आहे. भारतीय संघाने १९४ धावांचे लक्ष्य दिले.

---

## पुण्यात प्रशासकीय अधिकारी

आला असून त्यांच्याशी यशदातील अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर संवाद साधणार आहेत. 'अभिजात मराठी भाषा व प्रशासन' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, मराठी भाषा विभागाचे संचालक किरण कुलकर्णी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा सहभाग असून त्यांच्याशी 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे संवाद साधणार आहेत. शासकीय अधिका–यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. भारत सासणे यांच्या कथेवर आधारित 'मुर्गा' हा लघुपट दाखविला जाणार असून पटकथा व संवाद लेखन राजेश जोशी यांचे असून किरण लद्दे दिग्दर्शक आहेत. 'स्पर्धा परीक्षा संधी, समस्या व आव्हाने' या विषयावर पोलिस सेवेतील प्रशिक्षणार्थी बिरदेव डोणे, महसूल विभागातील सोनल सोनकवडे, उपजिल्हाधिकारी शुभम पाटील, सोनल सूर्यवंशी, प्रसाद चौघुले बोलणार आहेत. 'प्रशासकीय अधिकारी व साहित्यनिर्मिती' या विषयावरील परिसंवादात विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, सीजीएसटीच्या अतिरिक्त आयुक्त वैशाली पतंगे, 'बालभारती'च्या संचालक अनुराधा ओक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली इरपळे–घुले, राज्य कर उपआयुक्त अंजली ढमाळ यांचा सहभाग असणार आहे.'कृत्रिम बुद्धिमत्ता–साहित्य क्षेत्रातील आव्हाने' या विषयावरील परिसंवादात कॉर्पोरेट प्रशिक्षक सुनील पाटील, मुकुंद नाडगौडा, एससीईआयटीचे उपसंचालक विकास गरड बोलणार आहेत. यशदातील अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर, वाडिया महाविद्यालयातील प्रा. सचिन सानप हे 'अधिकारी साहित्य संमेलनाची दिशा व भवितव्य' या विषयावर बोलणार आहेत. सायंकाळी संमेलनाचा समारोप समारंभ होणार आहे.

---

## मद्यपी विमान कर्मचाऱ्यांना

वारंवार मद्य सेवन करणा–यास कडक शिक्षा (निलंबन/परवाना रद्द) करण्यात येणार आहे.पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व ब्रेथ ॲनालायझर चाचण्यांचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करणे बंधनकारक आहे. दुस–यांदा मद्यप्राशन चाचणी सकारात्मक आल्यास, परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल. विदेशी पायलट आणि इतर परदेशी पायलटची मद्यप्राशन चाचणी सकारात्मक आढळल्यास त्यांची अधिकृतता रद्द केली जाईल. तसेच, गैर–अनुसूचित ऑपरेटर आणि उड्डाण प्रशिक्षण संस्थांनाही हे नियम लागू आहेत. उड्डाणापूर्वी १२ तास मद्यपान न करण्याचा मूळ नियम कायम आहे. उड्डाणानंतरच्या चाचणीत सकारात्मक आढळल्यास एका वर्षासाठी परवाना निलंबित केला जाईल. ही सुधारणा ९ फेब्रुवारी २०२६ पासून लागू झाली आहे. नवीन नियमांमुळे उड्डाण सुरक्षा वाढवणे आणि कठोर नियमांमधून विमान कर्मचा–यांना दिलासा देण्याचा डीजीसीएचा प्रयत्न आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात



गणेशपार भागातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व,पत्रकार श्री रामप्रसादजी शर्मा यांचे वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करताना गणेशपार भागातील नागरिक

### तुकाराम पाटीलबुवा भोसले यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील बळेवाडी येथील रहिवासी व पंढरपूरचे निष्ठावंत वारकरी अण्णा म्हणून सर्वत्र परिचित असलेले ह.भ.प. श्री तुकाराम पाटीलबुवा भोसले (वय ८३) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने वारकरी संप्रदायात तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गेल्या तब्बल ५५ वर्षांपासून त्यांनी नित्य वारी करत अखंड पांडुरंगाचे स्मरण केले. सतत हसतमुख चेहरा, मनमिळाऊ व प्रेमळ स्वभाव आणि अत्यंत प्रामाणिक जीवनशैलीमुळे ते सर्वांच्या आदरास पात्र ठरले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. ते अशोक महाराज भोसले यांचे वडील होत.त्यांच्या निधनाने बळेवाडी परिसरात शोककळा पसरली असून वारकरी बांधवांकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. त्याचा दशक्रिया विधी शुक्रवार दि.२० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता श्रीक्षेत्र निंबोडी येथे होणार असून याप्रसंगी ह भ प श्री संतोष महाराज मोरे यांचे प्रवचन देखील होणार आहे.





माजलगाव:- शेतकरी कामगार पक्षाचे नेते अँड भाई नारायणराव गोले पाटील यांची बीड जिल्हा चिटणीस पूर्व विभाग पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना अभिषेक गुंदेकर, आकाश शिंदे, गोपाल गुंदेकर, संभाजीराव चव्हाण,विठ्ठल थेटे, शिवसैनिक जयराम राऊत देपेगांवकर

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन दि. १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी यंशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी ४० कलाकारांच्या संचात सादरीकरण होणार आहे. तसेच दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १.०० वाजेपर्यंत त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

# बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींचा सहभाग

## उमरीचा किताब मिळवला 'जय हनुमान प्रसन्न' बैलगाड्याने



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील उमरी (बु) येथे दरवर्षी शिवजन्मोत्सवानिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाते. यावर्षी बैलगाडा शर्यतीचे तिसरे वर्ष होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. यावर्षीचा पहिला किताब 'जय हनुमान प्रसन्न' बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या बैलगाड्याने उमरीचा किताब जिंकला.

शिवजन्मोत्सवानिमित्त उमरी येथे मराठवाडा स्तरीय बैलगाडा शर्यतीचे आयोजन दि. १७ रोजी शिवकेसरी मैदान येथे करण्यात आले होते. या बैलगाडा शर्यतीमध्ये १४० बैलगाडा प्रेमींनी सहभाग घेतला होता. बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण वीस फेऱ्या घेण्यात आल्या. यामध्ये चार उपांत्यपूर्व फेऱ्या झाल्या तर शेवटी आठ बैलगाड्यांमध्ये अंतिम फेरी झाली.

यामध्ये प्रथम आलेल्या बप्पासाहेब गोवर्धन इंदुरे यांच्या 'जय हनुमान प्रसन्न' या बैलगाड्यास उमरीचा प्रथम किताब देण्यात आला. त्यांना ३१ हजार १३१ रुपये कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक यांच्या हस्ते देण्यात आले. दुसरा किताब 'म्हळसोकी प्रसन्न' आकाश भैया हरगुडे (एम.एस. २२) यांना २१ हजार १२१ रुपये बैलगाडा शर्यत आयोजक कमिटी कडून देण्यात आले.

तिसरे बक्षीस 'जय हनुमान भारत चौधरी चेतक' अमोल जाधव यांनी पटकावले. त्यांना ११ हजार १११ रुपये महादेव माने व मुंजाभाऊ घायतिडक यांच्या तर्फे देण्यात आले. चौथे बक्षीस 'महारूद्र प्रसन्न' हदगाव यांना ७ हजार ७७७ रुपये उद्धव पौळ व आरोही लेडीज एम्पोरियम, माजलगाव यांच्या वतीने देण्यात आले.

पाचवा किताब मुजीद पठाण, बाबानगरचा 'बल्या डॉन' याने मिळवला. त्यांना ७ हजार ७७७ रुपये चेअरमन ज्ञानेश्वर आसाराम घायतिडक यांच्या वतीने देण्यात आले. सहावा किताब 'नगद नारायण प्रसन्न' आदिती गोरे यांनी पटकावला. त्यांना बळीराम सुखदेव घायतिडक यांच्या कडून ५ हजार ५५५ रुपये देण्यात आले.

सातवा किताब 'पब्लिक किंग रणवीर' गोरख पणकुठे यांनी जिंकला. त्यांना ४ हजार ४४४ रुपये परमेश्वर इनामकर व आबासाहेब सोनवणे यांच्या कडून देण्यात आले. आठवा किताब 'आई येडेश्वरी प्रसन्न' हादगाव यांनी जिंकला. त्यांना नितीन अण्णासाहेब घायतिडक यांच्या कडून ३ हजार ३३३ रुपये बक्षीस देण्यात आले.विजयी बैलगाडा मालकांना रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उमरी परिसरातील बैलगाडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासी मुलांच्या सृजनशीलतेतून साकारली शिवसृष्टी..!



वडवणी । प्रतिनिधी

आदिलशाही,मुघलशाही अशा बलाढ्य साम्राज्य असणाऱ्या...! आणि आपल्या प्रजेवर अन्याय, अत्याचार करणाऱ्या अफजल खान,शाहिस्तेखान,औरंगजेब अशा गनिमापासून प्रजेची सुटका करून,रयतेचे राज्य(म्हणजे स्वराज्य)स्थापन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी, डोंगर-दर्या-खोऱ्यामध्ये राहणाऱ्या अठरापगड जातीतील मावळ्यांची ची गोफण विणुन त्यांची फौज तयार करून,त्यांच्या साक्षीने व साथीने तोरणा गड जिंकून..!स्वराज्याचे तोरण बांधले.महाराजांच्या मावळ्यांमध्ये बाजीप्रभू देशपांडे,शिवा काशीद,तानाजी मालुसरे,जिवा महाले अशा कितीतरी अनेक मावळ्यांनी पराक्रम करत गनिमाच्या ताब्यात असणाऱ्या अनेक गड-किल्लच्यावर भगवा ध्वज फडकवला..!काही गड-किल्ले मावळ्यांनी आपल्या कल्पना शक्तीच्या सृजनशीलतेवर बांधली. अगदी तसाच शिवकालीन गड-किल्ले बांधण्याचा अनुभव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला.''शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण''(कॅम्प कांदेवाडी) या शाळेमध्ये छत्रपती संभाजी नगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी ''श्रीमती.चेतना मोरे'' मॅडम यांच्या प्रेरणेतून,शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्यांच्या संकल्पनेतून शिवसृष्टी उदयास आली असे,शाळेतील शिक्षक श्री.संभाजी मुसळे सर आणि त्यांचे सहकारी यांच्या माध्यमातून,शाळेतील आदिवासी मावळे(विद्यार्थी)यांच्या हातून शिवसृष्टी उभारली जात आहे.त्यामुळे शिवकालीन गड-किल्ले उभारणीचा स्व-अनुभव व विद्यार्थी कृतीयुक्त सहभागातून या नव्या सृजनशील उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा वाढण्यास उभारी मिळत आहे.

पान ६ वरुन...

### घरकुलचे हप्ते वेळेवर आणि

करावे, योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी अ. भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व नागरिकांनी गटविकास अधिकारी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रती माहितीस्तव जिल्हाधिकारी, बीड आणि तहसीलदार, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष जहाँगीर पठाण, शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, सरपंच अंबादास हारकळ, विजयानंद सोळंके, विजय चव्हाण,सुधीर उपाडे,ओमकार चव्हाण,दयानंद गुजर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यासंदर्भात राणा चव्हाण यांनी सांगितले की, सदरील समस्यांचे निराकरण लवकरात लवकर न झाल्यास पंचायत समितीच्या विरोधात शेतकरी, योजनांचे लाभार्थी नागरिक यांच्या सहभागातून तीव्र आंदोलन करावे लागेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

### संत भगवानबाबा प्रतिष्ठान

पी आर कार्ड सुपूर्द केले. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगरसेवक दत्ता जाधव उपस्थित होते.

सदर स्मशानभूमीत हिंदू व सर्वधर्मियांचे अंत्यविधी पार पडतात. दोन वर्षांपूर्वी स्मशानभूमी च्या जागेवर अतिक्रमणाचा प्रयत्न होत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या अतिक्रमणा बाबतीत सचिन मुळूक यांनी कठोर भूमिका घेत तातडीने पोलिस व प्रशासनाकडे धाव घेत प्रकरण निदर्शनास आणून दिले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी योग्य पावले उचलत प्रचंड संयमाने प्रकरण हाताळले त्यामुळे संभाव्य जातीय सलोखा अबाधित राहिला. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित संस्था व व्यक्तींना नोटिसा बजावून तंबी दिली तसेच प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्यानंतर स्मशानभूमीची अधिकृत नोंद व्हावी यासाठी मुळूक यांनी भूमिअभिलेख कार्यालयाकडे पी.आर. कार्डसाठी प्रस्ताव सादर केला होता. सुमारे दीड वर्षांच्या पाठपुराव्यानंतर आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागेची भूमिअभिलेख कार्यालयात अधिकृत नोंद करण्यात आली असून नगरपालिकेला पी.आर. कार्ड प्रदान करण्यात आले. बीड शहरातील एक महत्त्वाचा सामाजिक मोठा विषय यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे

व भाजपाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत. ना. पंकजाताई मुंडे या म्हणाल्या होत्या की ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या हातातील कोयता सोडवुन त्यांच्या हातात पेन द्या, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल व्हावे म्हणून तिगाव येथील शाळेची निवड करण्यात आली आहे. तिगाव येथील पाच शाळेत शालेय साहित्याची वाटप करण्यात आले. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तुम्ही हाक द्या आम्ही साथ देऊ. आणि भविष्यात ही शाळेच्या मदतीसाठी धावून येऊ असे मत संजय आंधळे यांनी व्यक्त केले यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, अंकुश वारे, भाजपा जिल्हा सचिव मच्छिंद्र झाटे, तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, बालासाहेब बादाडे, सरपंच सुभाष आजबे, उपसरपंच लक्ष्मण मुंडे, धनराज मुंडे, बालासाहेब शेंडगे, धनंजय शेंडगे, अशोक शेंडगे, सर्जेराव शेंडगे, कल्याण कोकणर, भाऊसाहेब गांडगे, विठ्ठल शिंदे, दत्ता रेडे, मोहन जावळे,अविनाश झोडगे, प्रभाकर मसवले, नभी शेख, जफार शेख, तुकाराम चौरे,अविनाश कुचेकर, दशरथ कुचेकर, नवनाथ तुरे, पप्पू मुजमुले, देवानंद तांबडे, विष्णू भांगे, वैभव जाधव, साबलकर, दत्ता चौरे, बप्पा शेंडगे,रतन सिरसट सह आदी उपस्थित होते.

### प्रथम घोडके यांनी उपसंचालक

प्रकारचे कार्य प्रशासकीय सेवेमध्ये प्रथम घोडके यांनी करावे अशी माझी अपेक्षा असल्याचेही ते पुढे म्हणाले की ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपल्या कष्टकरी आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावेत यापुढे आष्टी मुर्शिदपूर परिसरातील यशवंत किर्तीवंत प्रज्ञावंत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्येच करण्याचा निश्चय त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी कृषी अधिकारी गोरक्ष तरटे, वसुंधरा विद्यालयाचे प्रमुख मनोज रंजन धस संजय मेहेर प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची समायोजित भाषणे झाली सत्कारमूर्ती प्रथम घोडके यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांना मदत करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त केले यावेळी त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले यावेळी उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे नगरसेवक सुनील रेडेकर नगरसेवक किशोर झरेकर नगरसेवक भारत मुरकुटे ज्ञानदेव राऊत उपस्थित होते सुरुवातीस प्रथम घोडके आणि त्यांच्याबरोबर यशस्वी विद्यार्थ्यांची अण्णाभाऊ साठे चौकातून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मिरवणूक आयोजित करण्यात आली होती.

### जि.प.शाळा हरीलाल

येथील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष छगन राठोड आणि उपाध्यक्ष नवनाथ चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी कैलास राठोड, रघुनाथ राठोड, जीवन राठोड, ज्ञानेश्वर राठोड, रमेश राठोड, विकास राठोड, ग्रामपंचायत सदस्य दत्ता राठोड, संतोष चव्हाण यांच्यासह शाळेतील पवार सर, काळे सर, सपाटे सर, घोडके सर, कुलगुडे सर, श्रीमती देवडे मॅडम, श्रीमती नदाडे मॅडम, अंगणवाडी सेविका संगीता राठोड, मीरा चव्हाण, मीरा विजय राठोड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

## माजलगाव येथे बौद्ध धम्म प्रचारकांचा जिल्हास्तरीय गौरव सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व सातकर्णी युवक संघ, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मप्रचारक, बौद्धाचार्य व समता सैनिकांचा जिल्हास्तरीय गौरव सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. श्रावस्ती बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प, माजलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सद्धम्माचा आदर्श घराघरात आणि मनामनात पोहोचवण्यासाठी अविरत कार्य करणाऱ्या आंबेडकरी धम्म योद्ध्यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील सक्रिय बौद्ध विहार, धम्मप्रचारक, बौद्धाचार्य तसेच समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा जाहीर सत्कार या कार्यक्रमात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयु. भास्करराव भोजने (अध्यक्ष, विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य, अकोला) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. श्रीकिशन मोरे (सहयोगी प्राध्यापक, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रदीप भोगले साहेब (सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, बीड) यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून मा. भारत तांगडे (संस्थापक, जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड) कार्यभार सांभाळणार आहेत.या गौरव सोहळ्यास बीड जिल्ह्यातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सातकर्णी युवक संघाचे आयु. रविकांत उघडे, आयु. बाबासाहेब जाधव, आयु. अशोक कांबळे, आयु. संपादक सुहास बोराडे, आयु. लक्ष्मण जाधव व आयु. इंजी. बिभीषण उघडे यांनी केले आहे.

## सोमेश्वर हनुमान महादेव मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात नऊ तारखेला झाली होती गेल्या सहा ते सात दिवसापासून श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी तसेच त्या परिसरामध्ये सर्व आनंदमय पवित्र आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताहामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे विविध आयोजकांकडून आयोजन करण्यात आले होते यामध्ये सकाळी पाच वाजता काकडा हरिपाठ गाथा भजन श्री विष्णू सहस्त्रनाम श्री भावार्थरामायण इत्यादी महान अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी झाले तसेच प्रवचन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित असणाऱ्या गुन्हिजन हरिभक्त परायण महाराजांचे हरिकीर्तन या ठिकाणी संपन्न झाले त्यांनी सर्व या पंचक्रोशीतील भाविक भक्तांना आपल्या आपल्या उत्कृष्ट ज्ञानातून ज्ञान अमृत पाजले व सर्वांना भाविक भक्तांना हरिकीर्तनाने तृप्त केले असे या मंदिर परिसरामध्ये वातावरण गेल्या सहा दिवसांमध्ये पाहायला मिळाले याच सप्ताहाची सांगता सोमवारी मोठ्या उत्साहामध्ये भगवान श्री सोमेश्वर महादेवाची दिव्य भव्य अशी महापूजा रुद्राभिषेक संपन्न होऊन तसेच या ठिकाणी स्थापित असलेल्या सर्व देव त्यांचे पूजन होऊन मोठ्या उत्साहात या सप्ताहाची सांगता संपन्न झाली या वेळी बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त या ठिकाणी महाप्रसादासाठी उपस्थित होते या ठिकाणी अतिशय शिस्तीमध्ये सर्व चोक व्यवस्था मंदिर ट्रस्टीच्या वतीने श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होती या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विश्वस्त यांनी असे उत्कृष्ट धार्मिक कार्यक्रमाचे या ठिकाणी आयोजन करून सर्व येणाऱ्या भाविक भक्तांचे अत्यंत उत्कृष्ट आणि अप्रतिम व्यवस्था या मंदिर ठिकाणी केली होती या ठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांना देखील ही चोख व्यवस्था पाहून मंदिर कमिटीच्या या धार्मिक कार्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले आणि सर्वांनी श्री सोमेश्वर महादेवाचे शिस्तीमध्ये दर्शन घेऊन सर्वांनी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेचा महाप्रसाद सेवन केला यावेळी येथे उपस्थित असलेले मंदिर विश्वस्त तथा बीड नगर परिषदेचे नगरसेवक तथा उत्कृष्ट कायदे सल्लागार वकील गोविंद शिराळे पाटील व सर्व हजारो भाविक भक्त व श्री हनुमान मंदिर फाउंडेशन चे सर्व विश्वस्त उपस्थित होते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवांची, संतांची मंदिरे जतन करणे हे आपलं कर्तव्य -भगवानबाबा राजपूत

वडवणी । प्रतिनिधी

देवांचे आणि संतांचे मंदिरे ही आपल्याला जीवनाची पायवाट दाखवत असतात. त्यामुळे आपल्या भागातील सर्व देवतांचे आणि संत महंतांचे मंदिरे यांचे जतन करणे हे आपलं कर्तव्य आहे. यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा असे आवाहन राजा हरिश्चंद्र संस्थान येथे सुरू असलेल्या कीर्तन महोत्सवात काल्याच्या कीर्तनाप्रसंगी महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले.

जगभरातील एकमेव राजा हरिश्चंद्राचे मंदिर असलेल्या राजा हरिश्चंद्र पिंपरी येथील महाशिवरात्र महोत्सवाची सांगता या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. कीर्तनासाठी बीड जिल्ह्यासह राज्यभरातून लाखो भाविक माता भगिनी उपस्थित होत्या. महंत राजपूत महाराजांनी सांगितले की भारत देशाला खूप मोठा इतिहास आहे. देव देवतांचे, संत महानतांचे या देशावर खूप मोठे उपकार आहेत. या देशाला खूप मोठी संस्कृती लाभलेली आहे. खूप मोठा विचारांचा ठेवा मानवांसाठी या महापुरुषांनी करून ठेवला आहे. या सर्व सत्पुरुषांची मंदिरे आता देशात आहेत. या सर्व मंदिरांचं संगोपन होणे आवश्यक आहे. कारण ही मंदिरे आपल्याला आणि इथून पुढे जन्म घेणाऱ्या पिढ्यांना जीवनाचा मार्ग दाखवणार आहेत. या मंदिरातून कल्याणकारी मार्ग मानवांना दिसणार आहे. कीर्तनासाठी राज्यातील नामवंत मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे. कीर्तनानंतर



तयार करण्यात आलेला शेकडो पोते बुंदी चिवड्याचा महाप्रसाद लाखो भाविकांना वाटप करण्यात आला. यशस्वीतेसाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील हजारो सेवकांनी पुढाकार घेतला.

जिवंत असेपर्यंतच महत्त्व द्या..

आपल्या गावात भागात कितीही मोठा माणूस असला तरी त्याचं महत्त्व आपल्याला वाटत नाही. त्याच्या चांगल्या कार्याचा देखील आपण गौरव करत नाही. मात्र तो माणूस मेल्यानंतर त्याच्या नावाने मोठे मोठे बॅनर लावले जातात. त्याच्या आठवणी काढल्या जातात. जिवंत असेपर्यंत त्या माणसाची कदर करणे आवश्यक असते. त्याला मानसन्मान द्यायला हवा. संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत भगवान बाबा, भीमसिंह बाबा यासह अनेक सत्पुरुषांना जिवंतपणे समाजाने प्रेमापेक्षा यातनाच जास्त दिल्या. असेही ते म्हणाले.

या भागात जन्म घेणारे धन्य

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र या ठिकाणीच ऋषी विश्वामित्र यांच्या मागणीवरून राजा हरिश्चंद्राने आपलं राज्य स्वप्नात दान दिलं होतं. या ठिकाणी संत भगवान बाबा भिमसिंह बाबा यांच्या माध्यमातून महाशिवरात्र महोत्सव संपन्न झाले. आशा पवित्र भूमीत जन्म घेणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी स्वतःला धन्य समजले पाहिजे असेही ते म्हणाले.

**आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वतीने पंधरा लाखाचा निधी**

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर ऋषी विश्वामित्र यांचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या समोर उभारण्यात येणाऱ्या भव्य सभामंडपासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या आमदार फंडातून १५ लाख रुपयांचा निधी या भागाचे युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांनी जाहीर केला आहे. पुढील महिन्यात सभामंडपाचे काम सुरू होईल, असे असे भगवान महाराज राजपुत यांनी सांगितले.

**नामांकित कीर्तनकार, वादक आणि गायनाचार्यांची हजेरी**

या महाशिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकार निवृती महाराज इंदुरीकर, भगीरथ महाराज काळे, कोमलसिंग महाराज राजपुत धुळे, तुकाराम महाराज मुंडे, कृष्णा महाराज शास्त्री भगवान गडकर यांचे किर्तने झाली तर साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती महंत हनुमंत महाराज शास्त्री यांचे किर्तने तर सात दिवस प्रवचन सेवा साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती महंत हनुमंत महाराज शास्त्री यांची झाली. महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य खेडकर गुरुजी आदींची सेवा झाली.

# मराठवाड्यातील सद्या ७९.७५ टक्के पाणीसाठा



संभाजीनगर : मराठवाड्यातील ८९४ लघू, मध्यम, मोठ्या प्रकल्पांसह बंधाऱ्यातील पाणीसाठा ७९.७५ टक्क्यांवर आला आहे. सिंचन, पिण्यासह इतर कामासाठी वाढलेल्या पाण्याच्या गरजेमुळे पाणीसाठा झपाट्याने कमी होतो आहे.

गत पावसाळ्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने पाणीसाठे तुडूंब झाले होते. आताच्या घडीला मोठ्या ११ प्रकल्पांत सुमारे ८२.९१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. दुसरीकडे ७५ मध्यम प्रकल्पांत ७९.६६ टक्के, ७५८ लघू प्रकल्पांत ७०.०१ टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यात ८१.५९ टक्के तर तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील ३५ बंधाऱ्यात ६९.३५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांपैकी सिद्धेश्वरमध्ये ५८ टक्के तर निम्न दुधना प्रकल्पात ६३ टक्के उपयुक्त पाणीशिल्लक आहे. दुसरीकडे जायकवाडीत ८३ टक्के, येलदरीत ८७ टक्के, माजलगाव८७, मांजरा ८८, ऊर्ध्व पैनगंगा ८५, निम्न तेरणा ९२, निम्न मनार ६७ टक्के, विष्णुपुरी ७७ टक्के, सीना कोळेगाव ८२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक, असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील २७ लघू प्रकल्पांत ४१ टक्के तर परभणीतील २२ लघू प्रकल्पात ५२ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. नांदेडमधील ८० प्रकल्पांत ६८ टक्के, धाराशिव मधील २०६ प्रकल्पांत ६७ टक्के, लातूरमधील १३५ प्रकल्पात ७५ टक्के, बीडमधील १२६ प्रकल्पांत ६४ टक्के, जालन्यातील ६० प्रकल्पांत ६९ टक्के तर छत्रपती संभाजीनगर मधील ९९ लघू प्रकल्पात ९१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

## उन्हाळी मूग लागवड तंत्रज्ञान

मुगाची लागवड खरीप, वसंत, उन्हाळी हंगामात करता येते. मूगासाठी ओलसर आणि उबदार हवामान आवश्यक आहे. पिकाच्या वेळी स्वच्छ व कोरडे हवामान आवश्यक असते. पीक परिपाक्क होण्याच्या वेळी पाऊस हानीकारक असतो. मुगाच्या लागवडीसाठी योग्य निचरा असलेली माती आणि हलकी जमीन सर्वात योग्य मानली जाते, परंतु उन्हाळ्यात मूग लागवडीला जास्त सिंचनाची आवश्यकता असते.

मुगाचे सुधारित वाण : वैभव - हा मुगाचा २००१ मध्ये आलेला वाण आहे. त्याचा कालावधी ७० ते ७५ दिवस असून याद्वारे चौदा ते पंधरा किलो प्रति हेक्टरी ते उत्पादन मिळते. हे भान अधिक उत्पादनक्षम भुरी रोग प्रतिकारक्षम टपोरी हिरवे दाणे आणि महाराष्ट्राकरिता प्रसारित आहे. पी के व्ही. एम के एम ४ - या वाणाचा कालावधी ६५ ते ७० दिवसांचा असून उत्पादन प्रति हेक्टरी १२ ते १५ किलो इतका आहे. हे वाण अधिक उत्पादन मध्यम आकाराचे दाणे, एकाच वेळी पक्कता, बहु रोगप्रतिकारक आणि महाराष्ट्राकरिता प्रसारित आहे. पि. व्ही. के ग्रीन गोल्ड - या वाणाचा कालावधी ७० ते ७५ दिवसांचा असून दहा ते अकरा क्विंटल प्रति हेक्टर इतके उत्पादन मिळते. मध्यम आकाराचे दाणे एकाच वेळी पक्कता येणार आहे. हे बुरी रोग प्रतिकारक्षम तसेच विदर्भासाठी प्रसारित आहे. बीएम २००३-२- या वाणाचा कालावधी दिवस ६५ ते ७० असा आहे. १२ ते १४ किलो प्रति हेक्टर इतके उत्पादन या वानामुळे मिळते. याची वैशिष्ट्ये म्हणजे टपोरे दाणे, लांब शेंगा व भुरी रोग प्रतिकारक्षम अधिक उत्पादन आणि महाराष्ट्राकरिता हे वाण प्रसारित आहे.

बीएम २००२ -१ - या वाणाचा कालावधी ६५ ते ७० दिवसांचा असून या वानाद्वारे प्रति हेक्टरी १२ ते १४ किलो उत्पादन होते. या वाणाची वैशिष्ट्ये म्हणजे टपोरे दाणे लांब शेंगा व भुरी रोग प्रतिकारक्षम अधिक उत्पादन एकाच वेळी पक्क होणारा वाण आणि हे वाण महाराष्ट्राकरिता प्रसारित आहे.

उन्हाळी मूग पेरणीची वेळ : उन्हाळी मूग पेरणीसाठी संपूर्ण मार्च हा उत्तम काळ आहे. यानंतर पेरणी करू नका, अन्यथा मान्सूनच्या आगमनापूर्वी पीक काढता येणार नाही आणि मान्सूनच्या पावसामुळे ते नष्ट होण्याची भीती आहे. पेरणीसाठी १२ किमी. एकरी बियाणे द्यावे आणि ओळीतील अंतर २०-२५ सें.मी. ठेवा.

बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास पाच ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी. त्यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणू ची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावे मूग उडीद या पिकांच्या बियाण्यासाठी चवळी गटाचे रायझोबियम जिवाणूसंवर्धन वापरावे. ट्रायकोडर्मा मुळे सुरुवातीच्या काळात बुरशीजन्य रोगांचे नियंत्रण होते रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते.

सिंचन : पहिले पाणी पेरणीनंतर २०-२२ दिवसांनी आणि आवश्यकतेनुसार १०-१५ दिवसांनी द्यावे.

मशागत : तण नियंत्रणासाठी दोन वेळा खुरपणी करावी.पहिली खुरपणी २० ते २५ दिवसांनी आणि दुसरी खुरपणी ३० ते ३५ दिवसांनी करावी. जर शेतात जास्त झाडे असतील तर रोप ते रोपातील अंतर १० सें.मी. ठेवा.

रोग : साधारणपणे उन्हाळी मुगात कोणताही रोग किंवा किडीचा प्रादुर्भाव नसतो, परंतु मुळांच्या कुजण्याचा प्रादुर्भाव कुठेतरी दिसून येतो, त्यामध्ये रोगट झाडे पिवळी व कुजलेली दिसतात. रोगाचा अतिरेक झाल्यास संपूर्ण झाड नष्ट होते. का उन्हाळी मूग मुळांच्या कुजण्याच्या रोगापासून बचाव करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम थायरम या दराने कोरडी बीजप्रक्रिया करा.



## गव्हाच्या ओंब्या काळ्या पडण्याची कारणे आणि उपाय



जर गव्हाच्या ओंब्यामध्ये काळेपणा दिसला तर दुर्लक्ष करू नका. या काळेपणामुळे ओंब्या खराब होऊ शकतात आणि उत्पादनात घट होऊ शकते. ओंब्या काळे होणे हे कर्नाल बंट रोगामुळे होते.

रोगाची लक्षणे : ओंब्याचा रंग अंशतः काळे आणि पावडरसारखे होतात. काळ्या पडलेल्या ओंब्या कुजलेल्या माशासारखा वास सोडतात. हा रोग प्रामुख्याने मळणी दरम्यान (कापणीनंतर) ओळखला जातो. खराब झालेल्या ओंब्या पूर्णपणे भरलेले नसतात आणि आतील भाग काळे आणि पावडरसारखे होतात.

कर्नाल बंट पसरण्याची कारणे : गव्हाच्या फुलोऱ्याच्या अवस्थेत ८-२३ सेल्सिअस तापमान आणि उच्च आर्द्रता (ढगाळ हवामान, हलका पाऊस) या रोगासाठी अनुकूल असते. जर ही परिस्थिती कायम राहिली तर गव्हात करनाल बंट रोग पसरण्याचा धोका वाढतो. शेतकऱ्यांनी पिकावर हवामानाच्या परिणामाचे निरीक्षण करावे.

बियाणे/माती : जर बियाण्यांमध्ये करनाल बंट रोग आधीच असेल तर रोगाचा आणखी प्रसार होण्याचा धोका खूप जास्त असतो. म्हणून, पेरणीपूर्वी संक्रमित बियाण्यावर उपचार करणे महत्वाचे आहे. मातीचे बीजाणू (टेलिओस्पोर्स) देखील या रोगास कारणीभूत ठरतात, ज्यासाठी माती परीक्षण आणि प्रक्रिया आवश्यक असते.

एकात्मिक व्यवस्थापन आणि प्रक्रिया : प्रमाणित बियाणे वापरा. बियाणे खरेदी करताना सावधगिरी बाळगा आणि केवळ विश्वसनीय स्त्रोतांकडून रोग-प्रतिरोधक बियाणे खरेदी करा आणि पेरणी करा. बनावट आणि निकृष्ट बियाणे टाळा.

बीज प्रक्रिया : गहू पेरण्यापूर्वी योग्य बुरशीनाशकाने बियाण्यांवर प्रक्रिया करा. हे अत्यंत महत्वाचे आहे, कारण त्याशिवाय रोगाचा प्रसार होण्याचा धोका खूप जास्त असतो.

पीक रोटेशन : पाच वर्षे शेतात गैर-यजमान पिके (गहू व्यतिरिक्त) लावा. असे आढळून आले आहे की सलग अनेक वर्षे गहू पेरल्याने रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढतो. म्हणून, पीक रोटेशन सुनिश्चित करा. सिंचन व्यवस्थापन : गहू फुलोरा अवस्थेत असताना शेतात जास्त ओलावा टाळा. जरी हलका पाऊस पडला तरी, पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करा. कोणत्याही परिस्थितीत शेतात पाणी साचू नये.

पिकाचे आर्थिक नुकसान : कर्नल बंट, म्हणजेच ओंब्या काळ्या पडणे, थेट उत्पादनात ४०-५० टक्क्यांची घट करू शकते. ज्यामुळे बाजारभाव कमी होतात. जर गव्हामध्ये या रोगाचा थोडासाही अंश आढळला तर संपूर्ण निर्यात पीक रद्द केले जाऊ शकते किंवा निर्यातीसाठी योग्य मानले जाऊ शकत नाही.




### जागतिक दिवस
### छत्रपती शिवाजी महाराज जयंती

### महत्वाच्या घटना

१६३० : माता जिजाऊ ने शिवनेरी किल्ल्यावर शिवबांना जन्म दिला.
१८७८ : थॉमस एडिसनने फोनोग्राफचे पेटंट घेतले.
१८८४ : यू. एस. ए. च्या दक्षिण भागाला ६० चक्रीवादळांनी तडाखा दिला.
१९४२ : पर्ल हार्बरच्या हल्ल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझव्हेल्ट यांनी जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना बंदिवासात ठेवण्याच्या आदेशावर सह्या केल्या
१९८६ : आज पहिल्यांदा संगणकीकृत रेल्वे आरक्षण तिकिटांची सुरुवात झाली.
२००३ : तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातींवर संपूर्णपणे बंदी घालण्याच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली.
२०१४ : आजच्या दिवशी फेसबुक ने व्हॉट्सअ‍ॅप ला १९ बिलियन डॉलर ला विकत घेण्याचे घोषित केले, आणि दुसऱ्या दिवशी व्हॉट्सअ‍ॅप ला विकत सुद्धा घेतले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७३ : निकोलस कोपर्निकस  सूर्यकेन्द्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धांत मांडणारा पोलिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ (मृत्यू: २४ मे १५४३)
१६३० : छत्रपती शिवाजी महाराज (मृत्यू: ३ एप्रिल १६८०)
१८५९ : स्वांते अर्हेनिअस  स्वीडीश भौतिक व रसायनशास्त्रज (मृत्यू: २ आक्टोबर १९२७)
१८९८ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक गोकुलभाई भट्ट यांचा जन्म.
१८९९ : गुजरातचे दुसरे मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांचा जन्म.
१९०० : आजच्या दिवशी गुजरात चे माजी मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांचा जन्म.
१९०६ : माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी  राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक (मृत्यू: ५ जून १९७३)
१९१९ : अरविंद गोखले  मराठी नवकथेचे जनक, 'गंधवार्ता' या त्यांच्या कथेला आशियाई-अरबी-अफ्रिकी कथा स्पर्धेचे पहिले पारितोषिक मिळाले. भारतीय उपखंडातील प्रसिद्ध लेखकांच्या लघुकथांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना १९८४ मधे केंद्र सरकारची फेलोशिप मिळाली होती. (मृत्यू: २४ आक्टोबर १९९२)
१९२२ : सरदार बियंत सिंग  'खलिस्तानी' विभाजनवादी चळवळीचा कणा मोडून काढणारे पंजाबचे मुख्यमंत्री (मृत्यू: ३१ ऑगस्ट १९९५)
१९२५ : आजच्या दिवशी प्रसिद्ध कलाकार राम वी. सुतार यांचा जन्म.
१९३० : दक्षिणात्य चित्रपटाचे दिग्दर्शक काशिनाथ विश्वनाथ यांचा जन्म.
१९४३ : भारतीय अभिनेत्री बीना बॅनर्जी यांचा जन्म.
१९६२ : हॅना मंडलिकोव्हा  झेकोस्लोव्हाकियाची टेनिस खेळाडू
१९७७ : प्रसिद्ध गायक अवधूत गुप्ते यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१८ : पेशव्यांचे अखेरचे सरसेनापती सरदार बापू गोखले यांचे आष्टी येथे निधन
१८९५ : देशाचे प्रसिद्ध प्रकाशक मुंशी नवल किशोर यांचे निधन.
१९१५ : नामदार गोपाळ कृष्ण गोखले  थोर समाजसेवक, काँग्रेसचे अध्यक्ष, संसदपटू, भारत सेवक समाजाचे संस्थापक (जन्म: ९ मे १८६६)
१९५६ : केशव लक्ष्मण दफ्तरी  ज्योतिर्गणितज्ञ, संशोधक आणि बुद्धीप्रामाण्यवादी विचारवंत, वैदिक वाङ्मय, वेदान्त तत्त्वज्ञान आणि होमिओपाथी हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. अकरा उपनिषदांचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (जन्म: २२ नोव्हेंबर १८८०)
१९५६ : आचार्य नरेन्द्र देव  प्रजा समाजवादी पक्षाचे नेते, लखनौ विद्यापीठाचे कुलगुरू, सत्याग्रहाचे पुरस्कर्ते व उत्तर प्रदेशातील आमदार (जन्म: ? ? १८८९)
१९७८ : पंकज मलिक  गायक व संगीतकार (जन्म: १० मे १९०५)
१९९७ : डेंग जियाओ पिंग  सुधारणावादी चिनी नेते (जन्म: २२ ऑगस्ट १९०४)
१९९७ : राम कदम  संगीतकार (जन्म: २८ ऑगस्ट १९१८)
२००२ : प्रसिद्ध मराठी अभिनेते अनंत मराठे यांचे निधन.
२००३ : अनंत मराठे  पौराणिक हिन्दी व मराठी चित्रपट अभिनेते
२०१७ : भारताचे माजी सर न्यायाधीश अल्तमस कबीर यांचे निधन.

## बैलाला 'खांदेसूजी' झाल्यास असे करा उपाय !

उन्हाळ्यात बैलांकडून नांगरणी, कुळवणी तसेच पावसाळ्याच्या सुरुवातीस शेतीची मशागतीची बरीच कामे केली जातात. शेती कामामध्ये बैलांच्याकडून क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात काम करून घेतल्यास अनेक आजार होतात. अशाच प्रकारचा एक महत्त्वाचा आजार म्हणजे 'खांदेसूजी'.

खांदेसूजीची कारणे : 'जू' मानेस सतत घासणे. शेतकाम करताना किंवा बैलगाडीस मानेची कातडी जू आणि जुवाला असणारी खीळ यामध्ये चेंगरते. यातून खांदेसूज होते. काही वेळा जुवाचा मानेवर टेकणारा पृष्ठभाग हा अत्यंत खडबडीत असतो. हा भाग घासून मानेस सारखी इजा होते आणि खांदेसूजी होते. कमी जास्त उंचीची बैलजोडी यामुळे जनावरांच्या मानेवर ठेवले जाणारे जू हे तिरकस ओढण्यात येते. त्यामुळे दोन्ही बैलांना खांदेसुजीचा आजार होतो. तरुण वयातील बैल तसेच बैलांमध्ये सतत कामाचा ताण असणे. बैलांना अचानक जास्त प्रमाणात शेत कामास जुंपणे. बैलगाडीत जास्त वजन भरून ओढायला लावणे. कच्चे व खराब रस्त्यावर जास्त वजन असणारी बैलगाडी ओढायला लावणे

खांदेसूजीची लक्षणे : खांद्यावरील भागावर भयंकर सूज येते, सूज ही खांद्याची कातडी व त्याखालील त्वचेच्या भागावर येते. जू ओढताना खांद्याची कातडी ही मागच्या बाजूस जोराने ओढली गेल्यामुळे कातडी आणि कातडीखालील पडदा वेगळा होऊन त्वचेखाली रक्त साचते. खांद्यावरील सूज गरम असते. ती लाल दिसते व अत्यंत वेदनादायी असते. सुजेचा आकार हा लिंबू ते फुटबॉल एवढा असतो.  काही वेळा सूज मऊ, पाणी असणारी ते कडक लागणारी असू शकते. सुजेतून फुटून पाणी येऊ शकते.

खांदेसूजीचे दुष्परिणाम : खांद्यावर अशी सूज आल्यामुळे बैल काम करू शकत नाही. बैलास आराम दिल्यास सूज कमी होते. कामास जुंपल्यास पुन्हा वाढते. खांदेसूज झालेले जनावर विना उपचार कामास जुंपल्यास कातडीवर लहान जखम होऊन गळू येतात. खांद्यावर मोठी जखम झाल्यास त्यात रोगजंतूंचा शिरकाव होऊन आसडी पडते. अनेकदा प्रथम खांद्यावर लहान आकाराच्या गाठी येतात. उपचार न केल्यास त्या वाढून खांद्याचा कर्करोगसुद्धा होतो. मानेवरची कातडी गुंडाळली जाते. जनावरास कामास जुंपल्यास प्रचंड वेदना होतात.

खांदेसूजीवर उपचार : खांदेसुजीची लक्षणे बैलांमध्ये दिसल्यास जवळच्या पशु वैद्यकाकडून उपचार करावा. नुकत्याच झालेल्या खांदेसुजीत सुजलेल्या भागावर ४ ते ५ दिवस सूज कमी करणारे मलम लावावे. ताज्या सुजेत रोज ५ ते १० मिनिटे प्रमाणे बर्फाने ३ ते ४ दिवस शेकावे. ग्लिसरीनमध्ये मॅग्नेशिअम सल्फेट मिसळून पेस्ट खांद्यावर लावल्याससुद्धा नुकतीच आलेली सूज कमी होते. जुन्या सुजेसाठी गरम वाळू कपड्यात गुंडाळून खांद्यास ४ ते ५ दिवस शेक द्यावा. गरम पाण्याने शेक दिला तरी चालतो. शेक देताना जनावरास भाजणार नाही याची खात्री करून घ्यावी. अन्यथा त्वचा भाजण्याची शक्यता असते. गरम पाणी किंवा भुसा याचे तापमान आपल्या शरीराच्या तापमानापेक्षा थोडे जास्त असावे. यासाठी गरम पाणी, वाळू किंवा भुशास प्रथम आपण स्पर्श करून पाहावे, म्हणजे त्याचे तापमान कमी आहे याची खात्री होईल. खांद्यावर आलेल्या गाठी पू असणाऱ्या असतील तर पशु वैद्यकाकडून छोटी शस्त्रक्रिया करून घ्यावी. त्यातील पू काढून टाकावा. त्याचे रोज ड्रेसिंग करावे. उपचार करत असणाऱ्या बैलास अजिबात कामास जुंपू नये. पूर्णपणे आराम द्यावा. औषधोपचाराने जर खांद्यावरील गाठी कमी होत नसतील तर खांद्यावर पशु वैद्यकाकडून



छोटीशी शस्त्रक्रिया करून त्या काढून टाकाव्यात. त्यानंतर पशुवैद्यकाच्या सल्ल्याप्रमाणे योग्य औषधोपचार आणि काळजी घ्यावी.

गुरूवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ ५
राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# मोती तलाव येथे जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव प्रशिक्षण

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष आशिमा मित्तल व निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली आज जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड येथे जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव साहित्य हाताळणी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. या प्रशिक्षणाचे आयोजन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात आले होते. जिल्ह्यातील महानगरपालिका, नगर परिषद व नगर पंचायत अग्निशमन विभाग तसेच होमगार्डस्? दलातील कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक आधुनिक शोध व बचाव साहित्य हाताळणीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.



सदर प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश पूर, जलदुर्घटना तसेच इतर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित व सुरक्षित बचावकार्य करण्यासाठी संबंधित यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे हा होता. प्रशिक्षणादरम्यान जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांतर्गत नव्याने खरेदी करण्यात आलेल्या विविध आपत्कालीन साहित्याच्या वापर, देखभाल व सुरक्षित हाताळणीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये पुढील साहित्याचा समावेश होता. फायबर बोट ४ रबर बोट ३ स्कुबा सेट २फायर जेल ब्लँकेट २०लाईफबोये १०० बॅटरी कटर ९बॅटरी स्प्रेडर ९फ्लोटींग पंप १० पोर्टेबल जनरेटर ४ पोर्टेबल पंप १०मेगाफोन २० सेफ्टी नेट १०लाईफ जॅकेट २२५ रिफ्लेक्टर जॅकेट २२५ सदर साहित्य मनपा तसेच जिल्ह्यातील सर्व नगर परिषद व नगर पंचायत अग्निशमन विभागांना उपलब्ध करून देण्यात आले असून, आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.जिल्हाधिकारी श्रीमती. आशिमा मित्तल या होत्या. यावे मा.अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण श्री. शशिकांत हदगल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी , मनपा जालना अग्निशमन विभाग, भोकरदन, परतूर व अंबड नगर परिषद अग्निशमन विभाग, बदनापूर, जाफ्राबाद, मंठा, घनसावंगी व तिर्थपुरी नगर पंचायत विभाग आणि होमगार्डस्? विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीत 'उमेद' अंतर्गत कर्ज मंजुरी, वितरणाचा मेळावा

## खा.बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती

आष्टी। प्रतिनिधी

तालुक्यातील स्वयं सहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'उमेद' अर्थात दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान अंतर्गत बँक कर्ज मंजुरी पत्र व कर्ज वितरणाचा भव्य मेळावा गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



ग्रामीण भागातील महिला बचत गटांना स्वावलंबी बनविणे, लघुउद्योगांना चालना देणे व आर्थिक बळकटी प्रदान करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कर्जांचे प्रत्यक्ष वितरण या मेळाव्यात करण्यात येणार असून पात्र स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज मंजुरी पत्रे प्रदान करण्यात येतील. मेळाव्याचे आयोजन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड, पंचायत समिती आष्टी तसेच संबंधित बँकांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. दरम्यान, कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरिकांना व स्वयं सहाय्यता समूहांच्या सदस्यांना आपल्या तक्रारी व अडचणी थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या हाताला काम व उद्योगाला चालना देत आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असून, या कर्ज वितरण मेळाव्यामुळे आष्टी तालुक्यातील अनेक कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दौलवडगाव-सकाळी ९.३० वाजता, धानोरा-सकाळी ११ वाजता, कडा-दुपारी २ वाजता, आष्टी- दुपारी ४ वाजता कार्यक्रम आयोजीत केला आहे. सदरील कार्यक्रम वेळेत होणार असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे.

# भुईकोट किल्ला: झुडपे, अस्वच्छतेमुळे पर्यटकांना नाहक त्रास

## संवर्धनाची गरज, ४ कोटी ३९ लाख रुपये निधी दुरुस्तीसाठी खर्ची, परंतु झाडी पुन्हा वाढली

परंडा। प्रतिनिधी

तालुक्यातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या तटबंदी व बुरुजावर वाढलेल्या झाडीमुळे किल्ल्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे हा पुरातन ठेवा संकटात आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या भुईकोट किल्ल्याला पाहण्यासाठी विविध ठिकाणाहून पर्यटक येतात. परंतु किल्ल्याकडे जाण्यासाठी मार्गदर्शक फलक नाही आणि वाहन पार्किंगसाठी सोय नसल्यामुळे पर्यटकांना बसस्थानक परिसरातच वाहने पार्क करावी लागतात. इतिहासतज्ञ किल्ला पाहण्यासाठी येतात, पण आसपास अतिक्रमण झाल्यामुळे पार्किंगसाठी समस्या निर्माण झाली आहे. संपूर्ण शहरातील गटारीचे पाणी प्रवेशद्वाराजवळ सोडल्यामुळे पर्यटकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. पालिकेकडे या समस्येबाबत पत्रव्यवहार असूनही अद्याप पर्यायी व्यवस्था केली गेलेली नाही, ज्यामुळे पुरातन ठेवा घाणीच्या साम्राज्यात अडकला आहे. परिसर अस्वच्छ असल्याने पर्यटकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागतो. तसेच बुरुजावर व इतर ठिकाणी वाढलेल्या झाडीमुळे किल्ल्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे.



दरम्यान, किल्ल्याच्या दुरवस्थेबाबत दिव्य मराठीने वेळोवेळी वृत्त देऊन पाठपुरावा केल्यामुळे २०१४ मध्ये पुरातत्व विभागाने ७२ लाख रुपये निधी मंजूर केला आणि डागडुजी केली. मा. आ. सुजितसिंह ठाकुर यांच्या माध्यमातून ४ कोटी ३९ लाख रुपये निधी संवर्धनासाठी मिळाले आणि दुरुस्तीचे काम झाले. त्यात किल्ल्यातील अंतर्गत सिमेंट रस्ते, पुरातन विहिरीचे बांधकाम, दगडी फरशी व तटबंदीचा समावेश आहे. बुरुजावरील झाडी काढली गेली, परंतु मुळासह झाडे काढली नाहीत व तोडलेल्या खोडावर प्रक्रिया केली गेली नाही. त्यामुळे बुरुज व तटबंदीवरील झाडे पुन्हा वाढल्याने धोका निर्माण झाला आहे. दहा वर्षांपासून ४ पदे आहेत रिक्त किल्ल्यात २६ गोलाकार बुरुज असून त्यावर तोफा ठेवले आहेत. विविध धातूंनी नक्षीकाम केलेल्या ६ मोठ्या तोफा आणि लोखंडी ३ मोठ्या तोफा असून, लहान लोखंडी तोफांचा संख्या ५० आहे. तसेच १००० दगडी गोळे आहेत. किल्ला मोठा असल्यामुळे आणि तोफांची संरक्षण जबाबदारी एका चौकीदारावर आहे. पुरातत्व विभागाने १ मिस्री आणि ३ चौकीदार पदे मंजूर केली आहेत, परंतु १० वर्षांपासून ही पदे रिक्त आहेत. सध्या एका चौकीदार आणि दोन कंत्राटी सहाय्यकांवर किल्ल्याची जबाबदारी आहे. थांबण्यासाठी जागा नसल्याने पर्यटकांची गैरसोय खाजगी तत्वावर किल्ला दिल्यास त्याची देखभाल योग्य प्रकारे होऊ शकते. पर्यटकांची गर्दी वाढल्यास परिसरातील व्यवसायास चालना मिळेल व विकासाला गती मिळेल. पर्यटकांना थांबण्यासाठी सोय नसल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागतो. विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी किल्ला पाहण्यासाठी येतात, पण वाढलेल्या झाडांमुळे अडथळा येतो. आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या माध्यमातून स्वखर्चाने संपूर्ण खंदकातील खोदकाम करण्यात आले. सुस्थितीत पुरातन ठेवा असलेला किल्ल्यावर अनावश्यक झाडीमुळे धोका निर्माण झाला आहे.

# वसमत तालुक्यात ४ गुंठ्यांतील अफूची शेती उद्ध्वस्त;३.५ लाखांचा मुद्देमाल जप्त

हिंगोली। प्रतिनिधी

अमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत पोलिसांनी आजवरची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक कारवाई केली आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने वसमत तालुक्यातील शिरळी येथे धाड टाकून तब्बल ४ गुंठ्यांतील अफूची शेती नष्ट केली आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात अफूची लागवड शोधून काढण्याची ही पहिलीच घटना असल्याचे बोलले जात आहे. पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी पदभार स्वीकारल्यापासून गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला असून या कारवाईमुळे अमली पदार्थ माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.



वसमत तालुक्यातील शिरळी शिवारात १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने छापा टाकून १ क्विंटल ७७ किलो ४५ ग्रॅम वजनाची अफूची झाडे.

एकूण ३ लाख ५४ हजार ९०० रुपयांची जप्त केली व प्रताप सुरेश नलगे (वय ४२, रा. शिरळी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी कुरुंदा पोलिस ठाण्यात १७ फेब्रुवारी रोजी पहाटे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तालुक्यात अफुची शेती बहरल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती यावरुन ही धडाकेबाज कारवाई करण्यात आली. या यशस्वी कारवाईनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की जिल्ह्यात अफू, गांजा किंवा इतर कोणत्याही अमली पदार्थांची लागवड किंवा विक्री करणा-यांना सोडले जाणार नाही. अशा अवैध प्रवृत्तींविरुद्ध पोलिस दलाची धडाकेबाज मोहीम यापुढेही सुरूच राहील.

# अभिनव जिगेचे परिक्षेत यश

अंबड/प्रतिनिधी

नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जी मेन्स २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये अभिनव संतोष जिगे याने ९७ पर्सेंटाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.या गुणांसह तो आयआयटी प्रवेशासाठीच्या 'जी ॲडव्हान्स्ड' परीक्षेसाठी पात्र ठरला आहे. देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत अभिनवने आपल्या जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले असून या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ९७ पर्सेंटाईल गुण मिळवल्यामुळे त्याला देशातील नामवंत एनआयटी किंवा आयआयआयटी सारख्या संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रवेशाची संधी उपलब्ध झाली आहे.



अभिनवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षकांना दिले आहे. अत्यंत शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्य यामुळेच हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले.आता 'जी ॲडव्हान्स्ड' परीक्षेत यश मिळवून आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे त्याचे पुढील ध्येय आहे. या यशाबद्दल अभिनवचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून,पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# मुलानेच केली आईची हत्या

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर-सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्त्यावरील नवलेनगर परिसरात मंगळवारी (१७ फेब्रुवारी) दुपारी मुलानेच आईच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची थरकाप उडविणारी घटना उघडकीस आली. विशेष म्हणजे, आईचा खून करून मुलगा मृतदेहाशेजारील बेडवर बसून गोट्या खेळत असल्याचे पोलिसांनी पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बेबी सुधाकर गवारे (वय अंदाजे ६०, मूळ रा. कोपरगाव, सध्या रा. नवलेनगर, गुलमोहर रस्ता, सावेडी, अहिल्यानगर) असे मयत महिलेचे नाव असून, तिचा मुलगा सुहास सुधाकर गवारे (वय अंदाजे ३४) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मंगळवारी दुपारी तोफखाना पोलीस ठाण्याला नवलेनगर येथील एका घरात भांडण सुरू असल्याचा फोन आला. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित घराचा दरवाजा आतून बंद होता. पोलिसांनी खिडकीतून आत डोकावून पाहिले असता, सुहास गवारे हा बेडवर बसून गोट्या खेळत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी दरवाजा उघडण्यास सांगितले असता त्याने प्रतिसाद देण्याऐवजी खिडकीकडे पोलिसांच्या दिशेने हातात येईल त्या वस्तू फेकून मारल्या तसेच आक्षेपार्ह वक्तव्य केले.परिसरात मोठी गर्दी जमू लागल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली. सुहास दरवाजा उघडण्यास तयार नसल्याने पोलिसांनी खिडकीतून त्याच्यावर पाणी फेकून त्याचे लक्ष विचलित केले. त्याचवेळी दुसऱ्या बाजूने दरवाजा तोडून घरात प्रवेश करून त्याला ताब्यात घेतले. घरात प्रवेश केल्यानंतर बेबी गवारे या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनास्थळी नगर शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी भेट देऊन पाहणी केली. फॉरेन्सिक पथकासही पाचारण करण्यात आले होते. मयत महिलेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून उशिरापर्यंत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलिसांनी सुहास गवारे याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे नवलेनगर परिसरात एकच खळबळ उडाली असून, कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याची प्राथमिक चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. पोलिसांकडून घटनेमागील नेमके कारण शोधले जात आहे.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com
PHno 02483-271787
जा.क्र.२०२६/नपघ/जा.प्र./कावी-२८३१, दिनांक:-१८/०२/२०२६
**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शेषराव टोपाजी पवार रा. मुरमा खुर्द ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे सुप्रिया संदीप पवार रा. मुरमा खु ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ६९१ दि. ०४/०२/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडन आवक क्रं. ३२८६ दिनांक:-१८/०२/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सुप्रिया संदीप पवार रा.मुरमा खु ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. ९८२/१ मधील क्षेत्र १४७.२१ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- १५ फुट रुंदीचा न.पं.रस्ता
पश्चिमेस :- मुरलीधर देवडकर यांची जागा
दक्षिणेस :- २० फुट रुंदीचा न.पं.रस्ता
उत्तरेस :- अच्युत पिकनराव राठोड यांची जागा

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र १४७.२१ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

**जाहिर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. /२०२५**
**राजाराम पि. सिताराम रडे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय लोणीघाट**

पहा

राजाराम पि. सिताराम रडे रा. लोणीघाट (चौसाळा) ता. जि. बीड उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत सिताराम गुंडीबा रडे यांचा दिनांक १५/०२/१९९२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस लोणीघाट ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोणीघाट ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १८/०२/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०३/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# केवळ निवडणुकीपुरते सक्रिय होता का?: राजकीय नेत्यांना पाठिंबा देणारे मौलाना आता कुठे आहेत?

## आरक्षणाच्या मुद्द्यावरून इम्तियाज जलील आक्रमक

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

राज्यातील मुस्लिम समुदायाला देण्यात आलेले ५ टक्के 'एसबीसी' आरक्षण, त्यासंदर्भातील शासनादेश आणि परिपत्रक रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात संतापाची लाट असतानाच, माजी खासदार आणि एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी समाजातील मौलानांवर अत्यंत बोचरी टीका केली आहे. जे मौलाना केवळ निवडणुका आल्यावर सक्रिय होतात, त्यांनी आता समाजावर आलेल्या संकटाच्या वेळी रस्त्यावर उतरून नेतृत्व करावे, असे थेट आव्हान जलील यांनी दिले आहे. इम्तियाज जलील यांनी निवडणूक काळात मौलानांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, निवडणुका आल्या की काही लोक अचानक घराबाहेर पडतात आणि अमुक एका व्यक्तीला किंवा पक्षाला मतदान करा,



असे सांगू लागतात. तुम्ही काय पाच वर्षातून एकदाच बाहेर येणार का? आता समाजावर आरक्षणाचे संकट आले आहे, आता तुमची भूमिका काय? असा सवाल त्यांनी केला आहे.

बीडमधील एका राजकीय घडामोडीचा दाखला देत इम्तियाज जलील म्हणाले की, बीडमधील सर्व मौलवींनी एकत्रितपणे अजित पवार यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता आणि समाजाकडून मतदान करून घेतले. म्हणून तिथे आमचा पराभव झाला, आता माझी अपेक्षा आहे की, या सर्व मौलाना लोकांनी आरक्षणाच्या लढाईचे नेतृत्व करावे, मी स्वतः त्यांच्या मागे चालायला तयार आहे. इम्तियाज जलील म्हणाले की, आम्ही पाच वर्षे रस्त्यावर उतरून समाजासाठी आंदोलन करायचे आणि निवडणुका आल्या की हे लोक दुकाने उघडायला येतात. याला मतदान करा, त्याला मतदान करा, हे आता बंद झाले पाहिजेत. आता आरक्षणाची गरज आहे, तेव्हा या लोकांनी पुढे यावे. इम्तियाज जलील म्हणाले की, केवळ मुस्लिम समाजच नव्हे तर इतर समाजातील गरिबांबद्दलही जलील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ब्राह्मण समाजातही सर्वच श्रीमंत नाहीत. तिथल्याही गरीब मुलांना शिक्षणाची इच्छा आहे पण पैशाअभावी ते मागे पडत आहेत, त्यांनाही आरक्षण किंवा सवलती मिळायला हव्यात. मराठा समाजाच्या आरक्षणाला आमचा आधीपासूनच पाठिंबा आहे. समाजातील जो घटक शिक्षणापासून वंचित आहे, त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत बघून त्यांना सवलती दिल्या पाहिजेत, जेणेकरून गरीब मुस्लिम तरुण शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

# मनरेगा: पोखरीत कामे न करता लाखोंची बिले उचलली

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पोखरी ग्रामपंचायतीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) मंजूर करण्यात आलेल्या रस्ते कामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रत्यक्षात कामे न करता डांबरीकरण व मुरुमीकरण झाल्याचे दाखवून बिले काढण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले होते. चौकशी समितीने केलेल्या चौकशीतही सत्यता असल्याचे समोर असून याला जबाबदार कोण?, याची यादीच उपमुख्यअधिकारी यांनी मागविली आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी यांना पत्र पाठविले असून पत्रात महटले आहे, तक्रारदार राम खाडे यांनी १० ऑक्टोबर २०२५ रोजी सादर केलेल्या अर्थात पोखरी येथे विविध रस्त्यांची कामे मंजूर दाखवून निधी उचलण्यात आल्याचा आरोप केला आहे. या तक्रारीची दखल घेत

तपासणीत आढळलेल्या बाबी

नवरे ते मिसाळ सोलेवरती खडीकरण करणे भाग १ या रस्त्याचे कसलेही खोदकाम/मातीकाम मुरुमीकरण व खडीकरण झालेले नाही, नवरे ते मिसाळ सोलेवस्ती खठीकरण करणे भाग-२ या रस्त्याचे कसलेही खोदकाम/मातीकाम मुरुमीकरण व खडीकरण झालेले नाही, पोखरी ते करंजी रस्ता खडीकरण करणे भाग-१ या रस्त्याचे कसलेही खोदकाम/मातीकाम मुरुमीकरण व खडीकरण झालेले नाही., पोखरी ते करंजी रस्ता खडीकरण करणे भाग-२ या रस्त्याचे कसलेही खोदकाम /मातीकाम मुरुमीकरण व खडीकरण झालेले नाही., पोखरी ते करंजी रस्ता खडीकरण करणे भाग-३ या रस्त्याचे कसलेही खोदकाम /मातीकाम मुरुमीकरण व खडीकरण झालेले नाही., मनरेगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह मनरंगा ही ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीसाठी महत्त्वाची योजना मानली जाते. अशा योजनेत गैरप्रकार झाल्याच्या आरोपांमुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, चौकशीअंती दोषींवर कठोर कारवाई होणार का, याकडे आता ग्रामस्थ व नागरिकांचे लक्ष लागले आ प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला होता. दरम्यान, शाखा अभियंता यांनी १९ सप्टेंबर २०२५ रोजी स्थळ पाहणी करून सादर केलेल्या आहवालात संबंधित रस्त्यांवर

प्रत्यक्षात डांबरीकरण किंवा मुरुमीकरण झाले नसल्याचे नमूद केले आहे. काही कामांबाबत निधी वसुलीची शक्यता

या पार्श्वभूमीवर संबंधित कामाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे निश्चित करावीत, तसेच काम न करता बिले काढली असल्यास शासनाच्या निधीची वसुली करून विभागीय कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित प्रकरणात पाच दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

कागदोपत्री नोंदी असल्या तरी प्रत्यक्षात काम झाल्याचे आढळून आले नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तपासणीत पाच रस्ते

बीडीओंकडून मोघम अहवाल

पोखरी प्रमाणे कन्हेवाडी येथेही मनरेगाच्या कामात अनियमीतता झाल्याची तकार राम खाडे यांनी केली. तक्रारीनुसार चौकशीही झाली परंतु गटविकास अधिका-यांनी मोघम स्वरूपाचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठवून नामानिराळे होण्यात धन्यता मानली. आता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोघम अहवाल न देता स्वंयस्पष्ट अहवाल द्यावा, अशी तंबी देणारे पत्र बीडीओ यांना पाठविले आहे.

राम खाडे सक्रिय आष्टीतील सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी आजवर

अनेक प्रकरणात तक्रारी करून चुकीच्या कामांना ब्रेक लावण्याचे आणि गैरप्रकार जनतेसमोर आणण्याचे काम केलेले आहेत. मागील काही महिन्यांपुर्वी त्यांच्यावर अज्ञातांकडून हल्ला देखील झाला होता. यात ते गंभिर जखमी झाले होते. दरम्यान, उपचार घेवून ते पुन्हा सक्रिय झाले आहेत. त्यांच्याच तक्रारीची दखल घेवून गटविकास अधिकारी यांना आता नोटीस देण्यात आली आहे कामांचा समावेश असल्याचे पत्रात नमूद असून, कामाच्या ठिकाणी अपेक्षित स्वरूपाचे काम आढळले नसल्याची नोंद आहे.



जामगावात शिव जयंती निमित्त सुप्रसिद्ध आमु अभिजीत यांचा ऐतिहासिक गितांचा सदाबहार कार्यक्रम संपन्न यावेळी मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस जेष्ठ नेते देविदास आबा धस,युवा नेते सरपंच शाम भैया धस ड्रीमलँड इव्हेंट मॅनेजमेंट रविराज जेथे आदी छाया शिवा पोकळे

## रानोबा गायकवाड यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक तथा सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांचे सासरे रानोबा गायकवाड यांचे १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता आजारी असल्याने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते.



बीड शहरातील संत नामदेव नगर भागात राहणारे व गेवराई कृषी कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले कृषी पर्यवेक्षक रानबा गायकवाड यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर दिनांक १८ फेब्रुवारी रोजी अंकुश नगर भागातील स्मशान भूमी मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार, डॉक्टर, वकील, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .त्यांनी गेवराईच्या कृषी कार्यालयात प्रदीर्घ सेवा दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, दहा नातवंडे, एक पणतू असा मोठा परिवार असून त्यांचा जलदान विधी दिनांक नऊ फेब्रुवारी रोजी त्यांच्या राहत्या घरी संत नामदेव नगर येथे होणार असल्याची माहिती त्यांचे जावई सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे यांनी दिली.

## माध्यमाचा धसका बैठकीत एकाही बिअर बारला परवानगी नाही

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्यानंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बार ला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.**

बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आतापर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती. आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## घरकुलचे हप्ते वेळेवर आणि जिओ टॅगिंग लवकर द्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

घरकुलचे हप्ते वेळेवर पडत नाहीत, त्यामुळे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. तसेच पंचायत समितीचे एमआरईजीएस विभागातील इंजिनिअर गायगोठा, जलसिंचन विहीर व इतर योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेण्यासाठी जिओ टॅगिंगला वेळेवर येत नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर समस्या निर्माण होत आहे. आणि पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत



आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. तरी या संदर्भात पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी अ.भा.भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व नागरिकांनी गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे आहे पंचायत समिती अंबाजोगाई यांना जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी सोमवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, घरकुलचे हप्ते वेळेवर पडत नाहीत, त्यामुळे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. तसेच पंचायत समितीचे एमआरईजीएस विभागातील इंजिनिअर गायगोठा, जलसिंचन विहीर व इतर योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेण्यासाठी जिओ टॅगिंगला वेळेवर येत नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर समस्या निर्माण होत आहे. आणि पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. तरी या संदर्भात पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ उपरोक्त समस्यांचे निराकरण ◀◀ पान ३ वर

## संत भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरातील हिंदू स्मशानभूमीला मिळाले अधिकृत पी.आर.कार्ड

### जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पाठपुराव्यामुळे स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागा वाचली

बीड । प्रतिनिधी

शहरातील संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीवर काही समाजकंटकांकडून अितक्रमण करण्यात येत होते. मात्र शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी हे प्रकरण पोलिस आणि प्रशासनासमोर आणून समाजकंटकांचा डाव हाणून पाडला. दरम्यान जिल्हाप्रमुख मुळूक यांनी नगरपालिका प्रशासन



व भूमिअभिलेख कार्यालयाकडे दीड वर्ष कागदपत्रांची लढाई केल्यानंतर अखेर अधिकृत शासकीय मोजणी होऊन हिंदू स्मशानभूमीला अधिकृत ३ एकर ६ गुंठ्याचे (१२६०० चौ. मि.) पीआर कार्ड मिळाले आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी बुधवारी (दि.१८) मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे हिंदू स्मशानभूमीचे ◀◀ पान ३ वर

## जि.प.शाळा हरीलाल नाईक तांडाच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी छगन राठोड

गेवराई । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरिलाल नाईक तांडा गेवराई या शाळेच्या व्यवस्थापन



समितीचे गठन करण्यात आले असून, अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड तर सचिवपदी मुख्याध्यापक भडके सर, उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वांमध्ये बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील हरीलाल नाईक तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गठन करण्यात आले आहे. या समितीच्या अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड, सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक फडके सर तर उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या पुढील काळात शाळा सुंदर व सुसज्ज करण्यासोबतच ◀◀ पान ३ वर

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन खा.प्रितमताई मुंडेचा वाढदिवस साजरा

वडवणी । प्रतिनिधी

माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांचा वाढदिवस वडवणी तालुक्यांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये तिगाव व अंतर्गत ६ जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या वतीने करण्यात आले होते.

बीड जिल्ह्याच्या लोकप्रिय माजी खासदार डॉ.प्रितमताई



गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक व समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले. बँनरबाजी न करता गरजूना मदत करण्याचे आवहान नेहमी पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे करत असतात. यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करुन माजी खा.डॉ. प्रितमताताई मुंडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला आहे. यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे बोलताना म्हणाले की, प्रतिष्ठानच्या ◀◀ पान ३ वर

## मोठेवाडीत हरिनाम सप्ताह, शुक्रवारी सुनिताताई आंधळे यांचे किर्तन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथे गेल्या चार दिवसापासुन सुरू असलेल्या लाल हनुमान मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहात सहाव्या दिवसाची किर्तन पुष्फी रुपी सेवा राष्ट्रीय कीर्तनकार सौ.सुनिताताई आंधळे पुणे संस्थापक श्री संत भगवानबाबा मुलींची वारकरी संस्था आळंदी देवाची यांची दि.२० फेब्रुवारी शुक्रवार रोजी होणार असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या किर्तन श्रवणाचा आवश्य लाभ घ्यावा असे आव्हान अशोक मामा रासवे यांनी केले आहे.

मोठेवाडी येथील लाल हनुमान मंदिरात महाशिवरात्र व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि.१३ फेब्रुवारी रविवार पासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा भजन, शिवलिला ग्रंथ पारायण,जगदत गुरू तुकाराम महाराज गाथा भजन,श्री ह.भ.प.भागवताचार्य बाळु महाराज ऊगले यांच्या मधुरमय वाणीतून भागवत ज्ञान यज्ञ सोहळा होत आहे, तबला साथ मृदुंग महामेरू मनोहर म. थोरे, संगीत साथ निवृती म.शिंदे,महादेव म.कसपटे हे करत आहेत. सांय.हरिपाठ व रात्री ९:०० ते ११:०० श्री. ह.भ.प.जनाई म.कोकाटे,श्री. ह.भ.प.संगीताताई म. कोरडे,श्री.ह.भ.प. भागचंद्र म.झांजे,श्री.ह.भ.प. पंकज म.थोरे यांची किर्तन रुपी सेवा संपन्न झाली आहे. तर श्री.ह.भ.प. शिवदास म.जंगले(शास्त्री),श्री ह.भ.प.सौ.सुनिताताई म.आंधळे,श्री. ह.भ.प.केशव म.उखळीकर यांची हरी किर्तने होणार आहेत. दि.२१ फेब्रुवारी शनिवार रोजी रात्री१०:०० वाजता रंगीत संगीत भारूडाचा कार्यक्रम होईल.दि.२२ फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १:०० श्री. ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंदवे (बापु) यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा आवश्य लाभ घ्यावा असे आव्हान समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

## प्रथम घोडके यांनी उपसंचालक पदावर काम करतानाच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ध्येय ठेवावे -आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील प्रथम बाळासाहेब घोडके यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा अंतर्गत कृषी उपसंचालक वर्ग-१ पदी निवड झालीच आहे परंतु यापुढे त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगातील स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख या पदी निवड व्हावी असे ध्येय ठेवावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील नगरसेवक बाळासाहेब घोडके यांचा मुलगा प्रथम बाळासाहेब घोडके याची महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत



कृषी उपसंचालक होणे निवड झाल्याबद्दल आष्टी येथील नागरी सत्कारामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, नगराध्यक्ष जिया बेग, रंगनाथ धोंडे, व्यापारी संघटनेचे संजय मेहेर, इंजिनिअर किशोर नाना हंबर्डे, संतोष शेठ मेहेर, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, तालुका कृषी अधिकारी गोरक्षनाथ तरटे, विस्तार अधिकारी मनोरंजन धस, खंडू दादा जाधव, अनिल ढोबळे, शादुल्ला बेग टाटा हे उपस्थित होते

पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, आष्टी सारख्या ग्रामीण भागातून विद्यार्थ्यांनी अभ्यास करून हे यश प्राप्त केले आहे मोठे काम करण्याची आवश्यकता असून कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग करून शेती क्षेत्रामध्ये नवनवीन संशोधन करण्याची आवश्यकता असून शेतकऱ्यांनी कोणते वाण वापरावे उत्पादन वाढीसाठी कृषी क्षेत्रातील संशोधन होण्याची आवश्यकता आहे प्रथम घोडके यांनी पहिल्याच परीक्षेमध्ये यश प्राप्त केले आहे अजून वय कमी असल्यामुळे पुढील स्पर्धा परीक्षेसाठी आणखी भरपूर संधी उपलब्ध आहे त्यामुळे त्यांनी लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी जिल्हा पोलीस प्रमुख अशा प्रकारची पदवी प्राप्त करण्यासाठी आणखी अभ्यास करावा कृषी उपसंचालक पदी काम करताना शेतकरी समोर ठेवून कष्टकरी काम करी सर्वसामान्य नागरिक यांच्या डोळ्यातील तारुण्य पाहून मन द्रवले पाहिजे आणि त्यांच्या तोंडात हसू निर्माण झाले पाहिजे अशा ◀◀ पान ३ वर

## नुकसान भरपाई संदर्भात तात्काळ नवीन कायदा करून अंमलबजावणी करा -वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्यासाठी शेतीमाला संदर्भात किमान आधारभूत किंमत, पिक विमा व बोगस खते बी बियाणे कीटकनाशके औषधे संदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची कायद्यात तरतूद करून तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असल्या तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारे लोकप्रतिनिधी संबंधित खात्याचे कर्मचारी व अधिकारी, मंत्री कार्यालयात टक्केवारी घेतल्या शिवाय कामांना मंजुरी मिळत नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे नी केला . पशुसंवर्धन व



कृषी प्रदर्शन मेळावे राज्यात विविध ठिकाणी चालू आहेत परंतु जनतेच्या टॅक्स मधून जो पैसा शासनाला मिळतो त्याचा दुरुपयोग प्रदर्शने, मेळावे व बोगस योजना दाखवून संबंधित प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी मंत्री कार्यालयात टक्केवारी घेऊन पैसे हडप करतात त्यातून जनतेच्या हिताच्या योजनाची अंमलबजावणी नियमानुसार होत नाही. शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान नवीन खते बी बियाणे औषधी कीटकनाशके, आधुनिक शेती अवजारे, शेतीशी निगडीत नवीन प्रयोग व पशुसंवर्धना संदर्भात नवीन सरकारच्या योजनाची माहिती जनतेपर्यंत प्रसार माध्यमाद्वारे व विविध विभागामार्फत प्रत्यक्षात दिली पाहिजे परंतु जनतेचे पैसे खर्च करण्याकरता हे मेळाव्याचे आयोजन केले जाते असा गंभीर आरोप काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# आता 'या' ठिकाणी आंदोलनांवर बंदी! काँग्रेस भवन राड्यानंतर पोलीस आयुक्तांचा कडक निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

आंदोलनावेळी परिस्थिती चिघळून दगडफेक झाल्याने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी दोन्ही पक्षांवर कायदेशीर कारवाई केली असून दोषींवर कठोर कारवाई होईल. आयुक्त म्हणाले, पोलिसांना आंदोलन हिंसक होईल अशी पूर्वकल्पना नव्हती. दगडफेक, हिंसाचार होण्याची गुप्त माहिती आमच्याकडे नव्हती.

अशी माहिती असती तर परवानगी दिली नसती. आता राजकीय पक्षाच्या कार्यालयावर किंवा नेत्यांच्या निवासस्थानावर आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही. महापौरांच्या उपस्थितीत आंदोलन होऊनही त्यांच्यावर गुन्हा का दाखल केला नाही, या प्रश्नावर आयुक्त म्हमाले, पोलिसांकडे प्राप्त झालेल्या फिर्यादी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



तपासात जो दोषी आढळेल त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई होईल.काँग्रेस भवनवरील आंदोलन हिंसक होईल अशी कल्पना नव्हती. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जाणार आहे. अशा स्वरूपाच्या आंदोलनांना परवानगी दिली जाणार नाही.

काँग्रेसकडून पोलिसांवर करण्यात आलेले आरोप फेटाळत आयुक्तांनी सांगितले की, पोलिसांनी नियमानुसार आणि कायद्यानुसारच कारवाई केली असून त्यांच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही. रविवारी काँग्रेस भवन परिसरात भारतीय जनता पक्षाच्या आंदोलनावेळी झालेली झटापट, तसेच दगडफेकीनंतर भाजप, काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल केल्या. त्यानुसार भाजप शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, तसेच काँग्रेस शहराध्यक्ष, नगरसेवक अरविंद शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ रविवारी भारतीय जनता पक्षाच्या झालेल्या आंदोलनावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट, दगडफेक झाली. यात काँग्रेसचे तीन, भाजपचे दोन, दोन पोलीस, दोन पत्रकार किरकोळ जखमी झाले. त्यानंतर रात्री उशीरा भाजप शहराध्यक्ष नगरसेवक धीरज घाटे, युवा मोर्चाचे पदाधिकारी दुष्यंत मोहोळ यांच्यासह ५० ते ६० कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत काँग्रेसच्या कार्यकर्त्या प्राची दुधाणे ( ४२, रा. दुधाणेनगर, कर्वेनगर) यांनी फिर्याद दिली आहे. याचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमर काळंगे करत आहेत.

भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी पुनीत श्रीकांत जोशी ( ३५, रा. आयडियल कॉलनी, कोथरूड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, काँग्रेसचे पदाधिकारी अरविंद शिंदे, गौरव बाळंदे, अक्षय जैन, सागर धाडवे आदी कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे तपास करत आहेत.

# विमान अपघातापूर्वी 'मेडे कॉल' का दिला नाही? तपासाची सुई आता 'या' दिशेला

**पुणे । प्रतिनिधी**



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर लेअरजेट विमान लँडिंगदरम्यान रनवेच्या बाजूला कोसळून दुर्दैवी निधन झाले होते. या दुर्घटनेचा तपास सुरुवातीला बारामती पोलिसांकडून सुरू होता. मात्र, राज्य सरकारच्या आदेशानुसार हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे.

दरम्यान, नागरी उड्डाण मंत्रालयाची केंद्रीय यंत्रणा एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन कमिटी (एएआयसी) तांत्रिक बाबींच्या आधारे सखोल चौकशी करत असून, त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतरच सीआयडीच्या पुढील तपासाला ठोस दिशा मिळणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.मुंबईहून बारामतीकडे जात असताना संबंधित विमानात कोणता बिघाड झाला होता का, याचाही तपास सुरू आहे. विमानाचे पायलट कॅप्टन सुमित कपूर असून को-पायलट म्हणून शांभवी पाठक कार्यरत होत्या. दोघांची पार्श्वभूमी, उड्डाणपूर्वीचे संपर्क, ड्युटी रेकॉर्ड, कॉल डिटेल्स, तसेच मानसिक स्थिती यांचीही सीआयडीकडून पडताळणी केली जात आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या प्राथमिक माहितीनुसार, विमानाला रन वेवर उतरण्याची परवानगी दिल्यानंतर पायलटकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर अवघ्या एका मिनिटात एटीसीला रनवे परिसरात आगीचे लोळ दिसून आले. अपघातापूर्वी कोणताही 'मेडे कॉल' किंवा आपत्कालीन सूचना देण्यात आलेली नव्हती. त्यानंतर बारामतीतील गोजुबावी परिसरात विमान कोसळले आणि या भीषण दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. आता एअरक्राफ्ट क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन कमिटीचा अंतिम अहवाल आल्यानंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता असून, त्यानुसार सीआयडी पुढील गुन्हेगारी तपासाची दिशा निश्चित करणार आहे.

# तळेगावात नूतन कॉलेज परिसरात प्लास्टिक पाइपांना आग

**पिंपरी । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथे स्टेशन भागात नूतन अभियांत्रिकी जवळ रिकाम्या जागेवर ठेवलेल्या तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या पाणीपुरवठ्याच्या प्लास्टिकच्या पाइपांना आग लागण्याची घटना मंगळवारी (दि.१७) सायंकाळी सुमारे ५.१५वा. सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात भडकलेल्या आगीचे ज्वाळा आणि काळ्याकुट्ट धुराचे मोठे लोळ आकाशात उसळले. अचानक लागलेल्या आगीमुळे आणि धुराच्या लोटामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घाबराट निर्माण झाली. आगीची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेवून तातडीने नगर परिषद अग्निशमन विभागाला कळवले. अग्नीशमन अधिकारी संतोष तेलगे आणि कर्मचारी निरंजन भेगडे,अनुपम सिंग,शुभम काळोखे,ओम भेगडे या अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी तातडीने धाव घेवून सुमारे अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली.यावेळी तेथील गवतासही आग लागली होती.आगीच्या घटनेस जबाबदार कोण अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकां मधून येत आहे. .या घटनेमागील कारणांचा तपास सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



# समाविष्ट २३ गावांसाठी दोन हजार कोटींचे जागतिक बँक कर्ज; पाणी-सांडपाणी प्रकल्पांना गती

**पुणे । प्रतिनिधी**

जुलै २०२१ मध्ये महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी अखेर मोठा आर्थिक निर्णय घेण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, त्यासाठी प्राथमिक स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित गावांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याने या प्रक्रियेला वेग आला आहे.

राज्य सरकारने शहरालगतची २३ गावे जुलै २०२१ मध्ये पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. या समावेशनामागे नियोजनबद्ध विकास, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण, तसेच पाणी, सांडपाणी, रस्ते, पथदिवे, उद्याने, नाट्यगृहे आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, समावेशनानंतर विकास आराखडा तयार करण्याचे आणि बांधकाम परवानग्यांचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे देण्यात आले.

पीएमआरडीएने तयार केलेला आराखडा वादग्रास्त ठरल्याने तो रद्द करण्यात आला असून, बांधकाम परवानग्यांचे अधिकार अलीकडेच महापालिकेकडे परत आले आहेत. पाच वर्षे उलटूनही अंतिम विकास आराखडा तयार नसल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सुविधांचा अभाव असताना मिळकतकर वसूल केल्याची टीकाही केली जात आहे.



२३ गावांपैकी १६ गावांच्या सांडपाणी व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेला गती मिळाली आहे. उर्वरित पूर्व भागातील वाघोली, लोहगाव, मांजरी, शेवाळवाडी, वडाचीवाडी, औताडवाडी, हंडेवाडी आणि पश्चिमेकडील बावधन या सात गावांसाठी स्वतंत्र सांडपाणी योजना आखण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ७९० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, ३७८ किलोमीटर लांबीच्या सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, ४६ किलोमीटर मुख्य सांडपाणी वाहिनी तसेच ३१ किलोमीटर अतिरिक्त वाहिन्या उभारणे यांचा समावेश आहे. या योजनेसाठी निधी जागतिक बँकेमार्फत मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. समाविष्ट गावांमध्ये शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यासाठी जलवाहिन्या टाकणे, जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, पाण्याच्या टाक्या बांधणे आणि घरगुती मीटर बसविणे अशी कामे हाती घेतली जाणार आहेत. यासाठी पाच ते सहा पॅकेज तयार करण्यात आली आहेत. लोहगाव-वाघोली भागासाठी ३२३ कोटी रुपयांची निविदा काढून कामास सुरुवात झाली आहे. उर्वरित गावांतील प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव आहे.

# मुलीवर जबरदस्ती करुन व्हिडिओ केला, पोलिसांना, घरच्यांना व्हिडिओ पाठवला म्हणजे त्यांचं धाडस वाढतंय, गोपीचंद पडळकरांचा आरोप



**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील भिगवण (इहळसुरप) परिसरात एका मुलीचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली होती. या घडामोडींनतर भिगवणमध्ये हिंदू संघटनांच्यावतीनं मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चापूर्वी संबंधीत तरुणीनं व्हिडिओ शेअर केला आहे. संबंधित मुलीनं अपहरण झालं नसून मर्जीनं तरुणासोबत आल्याचं म्हटलंय. या दरम्यान भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर भिगवणमध्ये दाखल झाले आहेत.

भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर काय म्हणाले?

मुलीचा जबरदस्तीनं व्हिडिओ तयार करुन पोलीस अधिकारी, त्यांच्या नातेवाईकांना पाठवला जात असल्याचं भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले. मुलीचे भाऊ, मुलीचे मामा, मुलीचे चुलते यांच्याशी चर्चा केली आहे. मुलीला वडील नाहीत. मुलीचं लग्न ठरलेलं होतं, दोन चार दिवसात लग्न होणार होतं, अशा परिस्थितीत जबरदस्तीनं मुलीचं अपहरण केलं गेलं आहे, असा आरोप गोपीचंद पडळकर यांनी केला. मुलीचं अपहरण झाल्यानं भिगवणला आलो आहे. भिगवण पोलीस स्टेशनला भेट देणार आहे. हिंदू समाज संतापलेला आहे. हिंदू जन आक्रोश मोर्चाचं आयोजन केलेलं आहे. बाकीची सविस्तर चर्चा पोलीस स्टेशनला अधिकाऱ्यांसोबत करणार असल्याचं गोपीचंद पडळकर यांनी म्हटलं आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षकांसोबत फोनवर चर्चा केली आहे. हा व्हिडिओ कोठून आला असा प्रश्न विचारला. लोकेशन न दिसणारं एप वापरलं आहे, असं पोलिसांनी सांगितल्याचं गोपीचंद पडळकर म्हणाले.

पोलिसांना व्हिडिओ पाठवणं, घरच्यांना व्हिडिओ पाठवणं म्हणजे त्यांचा धाडस वाढलं आहे. या मुलाला वाचवण्याचा कोणीतरी प्रयत्न करतंय असा त्याचा अर्थ आहे. मुलाचे चुलते इथले गुंड आहेत. हिंदू मुलींच्या अपहरणात तो आरोपी होता. काही महाराजांना मारहाण केलेली आहे. मंदिरामध्ये ते कब्जा घेत आहेत, मंदिरातील मूर्तींची मोडतोड केलेली आहे, असं का घडतंय असा सवाल गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. पोलीस प्रशासन इतके दिवस का गप्प आहे, असा सवाल देखील गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यात तो आरोपी आहे, माझ्याकडे यादी आहे. इतक्या गुन्ह्यात तो आरोपी असेल तर त्याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई का झाली नाही, असा सवाल गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. या प्रकरणी पोलिसांसोबत सविस्तर चर्चा करुन आपल्यासमोर मांडणार असल्याचं गोपीचंद पडळकर म्हणाले.

भिगवण प्रकरणाचा घटनाक्रम

१७ फेब्रुवारी रोजी दुपारी साडे तीन वाजता मुलगी, तिचा भाऊ आणि आई लग्नाची खरेदी करुन जात असताना डोळ्यात चटणी टाकण्यात आली आणि मुलीचं अपहरण झाल्याची घटना घडली.

तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांकडून तपासासाठी सहा पथकांची स्थापना करण्यात आली. या घटनेमुळं मोठा रोष निर्माण झाला. यानंतर रात्री उशिरा हिंदुत्त्ववादी संघटनांकडून भिगवण पोलीस स्टेशनसमोर ठिय्या मांडला. यानंतर पुणे-सोलापूर महामार्गावर रोखण्यात आला. यानंतर जनआक्रोश मोर्चाची घोषणा करण्यात आली.

आज सकाळपासून जनआक्रोश मोर्चाची तयारी सुरु करण्यात आली. भाजप आमदार गोपीचंद पडळकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप जनआक्रोश मोर्चाला उपस्थित राहणार असल्याची माहिती.

जनआक्रोश मोर्चा ४ वाजता सुरु होण्यापूर्वीचं संबंधित मुलीचा व्हिडिओ समोर आला. गोपीचंद पडळकर यांच्याकडून मुलीवर दबाव टाकून व्हिडिओ तयार केला गेल्याचा आरोप करण्यात आला.

पोलिसांच्या तपासात संबंधित मुलगी आणि मुलगा यांच्यात महिनाभरात चर्चा झाल्याची माहिती कॉल रेकॉर्ड तपासलं असता समोर आहे.

# बारामतीला मिळणार अपर जिल्हाधिकारी, तर चाकणला अपर तहसील कार्यालय

**पुणे । प्रतिनिधी**


जिल्ह्यात जमीनविषयक दावे दाखल होण्याचे प्रमाण वाढल्याने दाव्यांची सुनावणी एकाच अधिकाऱ्याकडे होत असल्याने दावे निकाली निघण्याचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे निर्णयास दोन ते तीन वर्षे लागतात. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यासाठी नव्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन केले जाणार आहे, तर खेड तालुक्यात महसूल विभागात वाढलेले कामकाज पाहता चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापण्यास शासनाने सकारात्मकता दर्शविली आहे. पुणे जिल्ह्यात नागरीकरण, औद्योगीकरण वेगाने होत असल्याने प्रशासनाकडील कामकाजसुद्धा वाढले आहे.

जिल्ह्यात १३ तालुके असून, भौगोलिक विस्तारही मोठा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या कामासाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागते. त्यामुळे या दाव्यांच्या निकालासाठी वेळ लागत असल्याने आणखी एक अपर जिल्हाधिकारी पद स्थापन करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. जमिनीचे अकृषिक परवाने, जमीनविषयक दाव्यांची सुनावणी, गौणखनिज, पुर्नवसन विभाग, कुळकायदा शाखा आदी विभाग हे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे आहेत. या कामकाजाव्यतिरिक्त सातबारा संगणकीकरण, जिल्हा दौरा, विविध समित्यांच्या बैठका आदींमुळे जमीनविषयक दाव्यांवर वेळेत निर्णय होत नाही. त्यामुळे बारामती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. बारामती अपर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर या तालुक्यांचा समावेश होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ज्याप्रमाणे हवेली तालुक्यात तीन अपर तहसील कर्यालय आहेत. त्याच धर्तीवर खेड तालुक्यात आणखी एक अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबत शासन सकरात्मक आहे. चाकण येथे हे कार्यालय होणार असून, त्याअंतर्गत खेड तालुक्यातील निम्मी गावे या कार्यालयाशी जोडली जाण्याची शक्यता आहे.

# कलाकार कट्ट्याच्या स्थलांतराला राष्ट्रवादीचा तीव्र विरोध

**पुणे । प्रतिनिधी**

गुडलक चौकातील कलाकार कट्ट्याचे स्थलांतर करू नका, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना सोमवारी दिले. महापालिकेतील विरोधी पक्षनेते ड. निलेश निकम यांच्या नेतृत्त्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी पक्षाचे पालिकेतील गटनेते काका चव्हाण, नगरसेवक हर्षवर्धन मानकर उपस्थित होते. राष्ट्रवादीने उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनाही निवेदन दिले आहे. गेल्या अनेक वर्षापासून कलाकार कट्टा हा नवोदित तसेच ज्येष्ठ कलाकारांच्या संवाद, सादरीकरण आणि विचारमंथनाचा महत्त्वाचा मंच राहिला आहे.



शहरातील साहित्यिक, नाट्य, संगीत आणि विविध कला क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणणाऱ्या या ठिकाणाचे स्थलांतर करण्याऐवजी तो जतन करावा, अशी मागणी केल्याचे मानकर म्हणाले. पुण्याची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी कलाकार कट्टा स्थलांतरीत करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी अपेक्षा मानकर यांनी व्यक्त केली.

# खराडीत बिल्डरच्या खासगी जागेवरील अतिक्रमणासाठी महापालिकेची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

खराडी परिसरातील एका बड्या बिल्डराच्या भूखंडावरील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम महापालिकेच्या माध्यमातून हटविण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एकीकडे अनेक रस्त्यांवरील अतिक्रमणे वर्षानुवर्षे महापालिकेला काढता येत नसताना बिल्डरच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लावून केलेल्या कारवाईचे बिंग आता फुटले आहे.



महापालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने गत आठवड्यात महापौर व उपमहापौर निवडणुकीची लगबग सुरू असताना खराडीतील-बोराटेनगर येथे मोठी कारवाई केली. तब्बल १ लाख ८५ हजार चौरस फूट, अनधिकृत कच्चे-पक्के शेड व बांधकाम यावर ही कारवाई करण्यात आली होती. सकाळी सहा वाजल्यापासून सुरू झालेली कारवाई चर्चेचा विषय ठरला होता. मात्र, महापालिकेने केलेल्या या कारवाईचे खरे कारण समोर आले आहे.

ज्याठिकाणी प्रत्यक्षात कारवाई करण्यात आली, ती कोणत्या रस्त्यावरील अथवा सार्वजनिक जागेवरील नसून शहरातील एका बड्या बिल्डराच्या मालकीची आहे. या जागा संबंधित बिल्डरने विकत घेण्यापूर्वीच त्यावर काही अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे होती. संबंधित बिल्डरला ही ती काढता येत नव्हती. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून सूत्रे फिरली अन महापालिकेच्या माध्यमातून मोठा फौजफाटा लावून ही अतिक्रमणे हटविण्यात आली. मात्र, ही सार्वजनिक जागा नसताना अगदी महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या दिवशीच प्रशासनाने ही कारवाई केल्याने आता आश्चर्य व्यक्त केले जात आहे. धक्कादायक म्हणजे येथील अतिक्रमणांवर जुन्या नोटिशीच्या आधारे कारवाई करण्यात आली आहे. खराडी येथील कारवाईबाबत अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी बांधकाम विभागाच्या निर्देशानुसार कारवाई केल्याचे सांगितले, तर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र अतिक्रमण विभागाकडे आलेल्या तक्रारीनुसार कारवाई केल्याचा दावा केला आहे. कारवाईवरून अतिक्रमण विभाग व बांधकाम विभाग यांच्यात टोलवाटोलवी सुरू झाल्याने कारवाईबाबत संशय आणखीच गडद झाला आहे. एका बिल्डरसाठी महापालिका आणि पोलिस प्रशासनाची एवढी मोठी यंत्रणा कामाला लागली असताना राजकीय मंडळींनी मात्र बघ्याची भूमिका घेतली असल्याचे चित्र आहे. बिल्डरसाठी केल्या गेलेल्या कारवाईबाबत एकाही लोकप्रतिनिधीने प्रशासनाला जाब विचारण्याचे धाडस दाखविले नसल्याने या सर्वांच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार 'या' शहरात रंगणार, ४२ शहरातील मल्ल सहभागी होणार

**पुणे । प्रतिनिधी**

यावर्षीची ६८ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पुणे जिल्ह्यातील वाघोलीत होणार आहे. १८ ते २२ मार्च दरम्यान वाघोलीत ही कुस्ती स्पर्धा पार पडणार आहे. कुस्तीगीर परिषदेच्या पुण्यात झालेल्या बैठकीत वाघोलीच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. यावेळी कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या कुस्ती स्पर्धेत ४२ शहरातील जवळफास ८४० कुस्तीगीर सहभागी होणार

याज्याच्या क्रीडा विश्वात मानाच्या समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच यजमानपद यावर्षी पुण्याला मिळालं आहे. पुण्यातील वाघोलीत या स्पर्धा होणार आहेत. वाघोलीत १८ ते २२ मार्च दरम्यान विविध वजनी गटात या स्पर्धा पार पडणार आहेत. याचबरोबर ६८ वी वरिष्ठ गट माती आणि गादी प्रकारातील राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा देखील होणार आहे. या कुस्ती स्पर्धेत ४२ शहरातील जवळफास ८४० कुस्तीगीर सहभागी होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे विजेत्याला मल्ल मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ १ किलो चांदीची गदा देण्यात येणार आहे. तर इतर गटातील कुस्तीगिरांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. आज पुण्यात कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या उपस्थितीत कुस्तीगीर परिषदेची बैठक झाली. यावेळी हा निर्णय घेण्यात आला.



या स्पर्धेमुळे राज्यातील ग्रामीण भागातील मल्लांना व्यासपीठ मिळते

महाराष्ट्र केसरी ही महाराष्ट्रातील माती व मॅट विभागातील सर्वोच्च मानाची कुस्ती स्पर्धा आहे. ज्याची सुरुवात १९६१ मध्ये कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या पुढाकाराने झाली होती. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत आयोजित या स्पर्धेत विजेत्याला मानाची 'गदा' व रोख रक्कम देऊन गौरवण्यात येते. पहिली महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही १९६१ मध्ये छत्रपती संभाजीनगर मध्ये झाली होती. या स्पर्धेचे पहिले मानकरी दिनकर दह्यारी होते. ही स्पर्धा माती (उश्रू) आणि मॅट (चरीं) अशा दोन्ही प्रकारांत खेळवली जाते. विविध वजनी गटातील मल्ल अंतिम लढतीसाठी पात्र ठरतात. या स्पर्धेमुळे राज्यातील ग्रामीण भागातील मल्लांना व्यासपीठ मिळते आणि ही महाराष्ट्राच्या परंपरेचा भाग आहे. विजेता मल्ल 'महाराष्ट्र केसरी' किताबाचा मानकरी ठरतो आणि त्याला मानाची गदा मिळते. महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही एक केवळ कुस्ती नसून तो एक मोठा सांस्कृतिक व क्रीडा उत्सव मानला जातो. या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कामाकोपऱ्यातून कुस्तीप्रेमी कुस्तीचा थरार पाहण्यासाठी येतात.